cmyk

## संपादकीय

### संसदीय थट्टा थांबवून सरकारने चर्चा करावी

संसदेच्या सध्या सुरू असलेल्या अधिवेशनाचा मंगळवारचा दिवसही कामकाज न होता गोंधळातच आटोपता घ्यावा लागला. या अधिवेशनात आतापर्यंत अपेक्षित असे कोणतेच कामकाज होऊ शकलेले नाही. विरोधी पक्षाने त्यांच्या परीने त्यांचे मुद्दे पहिल्या दिवसापासून लावून धरले. पण त्यातील कोणत्याच मुद्द्यावर चर्चा करायची नाही या भूमिकेवर सरकार ठाम राहिले. त्यातूनच ही गोंधळाची स्थिती निर्माण झाली आहे. काही वेळा तर असे अनुभवाला आलेले दिसले की सरकारलाच हे अधिवेशन चालवण्यात फारसे स्वारस्य नाही.


दैनिक **राज्य लोकतंत्र**

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड - महाराष्ट्र | वर्ष - ४ | अंक-२२८ | बुधवार, दि.११ डिसेंबर २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने- ६ | किंमत ३ रूपये


### गौतम अदानींनी घेतली मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट

मुंबई : अदानी समूहाचे अध्यक्ष गौतम अदानी यांनी मंगळवारी (दि.१०) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. मुख्यमंत्री झाल्याबद्दल फडणवीस यांचे अदानी यांनी यावेळी अभिनंदन केले. 'सागर' बंगल्यावर फडणवीस यांची भेट घेतली. दोघांमध्ये दीड तास चर्चा झाल्याचे समजते. अदानी महायुती सरकारच्या शपथविधी कार्यक्रमाला येऊ न शकल्यामुळे त्यांनी आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन शुभेच्छा दिल्या आणि अभिनंदन केले असल्याचे सांगण्यात आले आहे. विधानसभा निवडणुकीदरम्यान महाविकास आघाडीने भाजप आणि अदानी संबंधांचा मुद्दा उचलून धरला होता. विशेषत: मुंबईतील धारावी येथील जमीन अदानी यांना देण्यासाठी महाविकास आघाडीचे सरकार पाडण्यात आले

# आता १४ डिसेंबरला शेतकरी दिल्लीकडे कूच करणार

## आंदोलनाला ३०३ दिवस पूर्ण, यशस्वितेसाठी आज प्रार्थना

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**शंभू बॉर्डरवर ठाण मांडून असलेले शेतकरी पुन्हा एकदा दिल्लीकडे कूच करण्याची घोषणा केली आहे. शेतकऱ्यांचा मोर्चा आता १४ डिसेंबरला दिल्लीकडे कूच करणार आहे. आमच्या आंदोलनाला ३०३ दिवस पूर्ण झाले असून शेतकऱ्यांच्या आमरण उपोषणाला सुद्धा १५ दिवस झाले आहेत असे शेतकरी नेते सर्वनसिंह पंढेर यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत सांगितले.**



आम्ही नेहमीच चर्चेचे स्वागत केले आहे. मात्र, सरकारकडून कोणीही आमच्याशी संपर्क साधला नाही. त्यामुळे दोन्ही संघटनांनी १४ डिसेंबरला १०१ शेतकऱ्यांची तुकडी पाठवण्याचा निर्णय घेतला आहे. बुधवारी शेतकरी आंदोलन यशस्वी होण्यासाठी प्रार्थना केली जाईल. तसेच, आंदोलनादरम्यान अटक करण्यात आलेल्या किंवा ताब्यात घेतलेल्या शेतकऱ्यांची सुटका करण्याची आमची मागणी आहे असे सर्वनसिंह पंढेर यांनी सांगितले. याबरोबरच सर्वनसिंह पंढेर यांनी पंजाबमधील सर्व गायक आणि प्रसिद्ध व्यक्तींनी पुढे येऊन त्यांच्या मागण्यांसाठी सीमेवर अनेक महिने बसलेल्या शेतकऱ्यांच्या बाजूने आवाज उठवण्याचे आवाहन केले. दरम्यान,

◀◀ पान २ वर

### १४ डिसेंबरला मंत्रीमंडळाची घोषणा होण्याची शक्यता

**फडणवीस, शिंदे, पवार यांच्या बैठकीत निर्णय झाल्याची चर्चा**



**मुंबई । प्रतिनिधी**

**महायुती सरकारच्या मंत्रिमंडळाचा पहिला विस्तार येत्या १४ डिसेंबर रोजी होण्याची शक्यता आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यात झालेल्या चर्चेत ही तारीख निश्चित करण्यात आल्याचे वृत्त आहे.**

राज्य विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन अवघ्या पाच दिवसांवर

◀◀ पान २ वर

### मस्साजोग प्रकरणात शासन-प्रशासनाने न्याय द्यावा-आ.संदीप क्षीरसागर

**पवनचक्की संदर्भाने होत असलेल्या बेकायदेशीर बाबींवरही आळा घालण्याची मागणी**



बीड । प्रतिनिधी

पवनचक्की धारकांकडून बीड जिल्ह्यात अनेक बेकायदेशीर गैरप्रकार होत आहेत. पवनचक्की संदर्भाने शेतकरी व नागरिक यांना धमकावणे, गुंडगिरी, फसवणूक झाल्याचे अनेक प्रकार समोर आले आहेत. यातच पवनचक्कीच्याच संदर्भातील प्रकरणातून केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच असलेले स्व.संतोष देशमुख यांची निघृण हत्या झाली आहे. या प्रकरणात शासन आणि प्रशासनाने स्व.संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांना संरक्षण आरोपींना तात्काळ अटक करून कायदेशीर कडक कारवाई करावी अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी केली आहे.

बीड विधानसभा क्षेत्रासह संपूर्ण बीड जिल्ह्यात गेल्या दोन वर्षांपासून पवनचक्की कंपन्या कार्यरत असल्याचे दिसून येत आहे. दरम्यान या पवनचक्की कंपन्यांच्या मालक व हस्तकांकडून ग्रामस्थांना व शेतकऱ्यांना धमकावणे, फसवणे, मारहाण करणे, जमिनी बळकावणे, पवनचक्की चे काम करताना शेतातील पिकांचे नुकसान करणे असे अनेक प्रकार मागील काळात घडले आहेत. यासोबतच पवनचक्कीच्या कामात शेतकऱ्यांची जमिनीचे हस्तांतरण झाल्यानंतर शेतकऱ्यांना ठरलेल्या रकमेप्रमाणे देयके न देणे असेही गैरप्रकार पवनचक्की कंपन्यांकडून व त्यांच्या हस्तकांकडून घडलेले आहेत. आता तर या लोकांची थेट हत्या करण्यापर्यंत मजल गेली आहे. केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच स्व.संतोष देशमुख यांची निघृण हत्या झाल्याचा प्रकार सोमवार (दि.९) रोजी बीड जिल्ह्यात घडला आहे. हा प्रकार म्हणजे कायदा आणि सुव्यवस्थेचे अक्षरश: वाभाडे काढल्यासारखा आहे. त्यामुळे या घटनेतील आरोपींना तात्काळ अटक करून कडक कायदेशीर कारवाई करावी. यासोबतच बीड मतदारसंघ क्षेत्रातील चौसाळा, नेकनूर, लिंबागणेश जिल्हा परिषद गटातील बहुतांश गावात देखील पवनचक्की मालक व त्यांच्या हस्तकांकडून वारंवार असे प्रकार घडले आहेत. त्यातून काही शेतकऱ्यांनी आत्महत्या

◀◀ पान २ वर

# सरपंचाच्या खुनानंतर केजमध्ये हिंसक वळण; बस पेटवली

## मनोज जरांगे आक्रमक; रास्ता रोको आंदोलनादरम्यान जमाव संतप्त

**केज । प्रतिनिधी**

**जिल्ह्याच्या केज तालुक्यातील मस्साजोग येथे सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करून खून करण्यात आल्याची खळबळजनक घटना घडली. मृताच्या नातेवाईकांनी आरोपींना अटक करण्याच्या मागणीसाठी अहिल्यानगर -अहमदपूर महामार्गावर रास्ता रोको आंदोलन केले. यावेळी या आंदोलनाला हिंसक वळण येऊन जमावाने बस पेटवून दिली. यावेळी पोलिस आणि आंदोलक आमने-सामने आले होते. मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनीही या घटनेची दखल घेत मस्साजोग गाव गाठले आहे. या वेळी ते चांगलेच आक्रमक झाले होते. दरम्यान पोलिस अधीक्षकांच्या अश्वासनानंतर प्रेत ताब्यात घेवून रात्री १०.३० वा. अंत्यसंस्कार करण्यात आल्याचे समजते.**

केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख हे सोमवारी दुपारी ३ वाजता, केजहून (एम. एच. ४४ बी. ३०३२) कारने गावाकडे निघाले होते.

◀◀ पान २ वर







### दोषींना सोडणार नाही- एसपी बारगळ

संतोष देशमुख खून प्रकरणांमध्ये कोणीही दोषी असले तरी यातील कोणालाही सोडले जाणार नाही असे आश्वासन पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांनी मनोज जरांगे पाटील यांच्या समक्ष आंदोलनकर्त्यांना दिले. रात्री उशिरापर्यंत पोलीस ठाण्यासमोर जमाव होता.

### पोलिस निरीक्षक पाटील निलंबीत, महाजन यांची चौकशी

संतोष देशमुख खुन प्रकरणाअगोदर संबंधित आरोपींवर खंडणीचा गुन्हा दाखल होता. त्यांना जामीन मिळाल्यावर त्यांनी खुन केला. या वेळी पोलिस निरीक्षक पाटील यांच्यासोबत आरोपी फिरत असल्याचे एका व्हिडीओद्वारे खा. बजरंग सोनवणे यांनी सांगून त्यांच्या कारवाई करण्याची मागणी केली होती. तसेच आंदोलनकर्त्यांनी सुध्दा पाटील यांना निलंबीत करा, अशी आक्रमक भुमिका घेतली होती. यानंतर पाटील यांना एसपींनी तातडीने निलंबीत केले असल्याचे समजते.तसेच एपीआय महाजन यांची चौकशी सुरू आहे.

### दोन आरोपींना अटक

दरम्यान, संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी पोलिसांनी दोन आरोपींना ताब्यात घेतले आहे. जयराम माणिक चाटे (रा. तांबवा ता.केज) आणि महेश सखाराम केदार (रा. मैंदवाडी ता.धारुर) अशी आरोपींची नावे आहेत. सध्या त्यांची कसून चौकशी सुरु असून त्यांच्याकडून इतर आरोपींची माहिती घेण्याबाबत प्रयत्न सुरु आहेत. जयराम चाटे आणि महेश केदार हे अगोदरच गुंडगिरी व उनाडपणा करणारे असल्याचे समजते.

### काय म्हणाले मनोज जरांगे

मनोज जरांगे यांनी देशमुख कुटुंबियांचे सांत्वन करत या घटनेसंदर्भात वरिष्ठ पोलिसांशी फोनवरून संवाद साधला. मनोज जरांगे म्हणाले, मस्साजोग गावच्या सरपंचाच्या हत्येची घटना दुर्दैवी आहे. बीड जिल्ह्याला कलंक लावण्याचे काम सुरू आहे. सुजाण आणि चांगल्या जनतेला वेठीस धरण्याचे, त्रास देण्याचे काम सुरू आहे. या घटनेमुळे संपूर्ण राज्य ढवळून निघाले आहे. संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना अटक झालीच पाहिजे. या प्रकरणाची सीआयडी मार्फत चौकशी करून आरोपींना फाशीची शिक्षा झाली पाहिजे, अशी मागणी मनोज जरांगे यांनी केली.

### खा. सुप्रिया सुळेंचा एसपींना फोन

देशमुख खुन प्रकरणात खा. सुप्रिया सुळे यांनी बीडच्या एसपींना फोन करुन तातडीने कारवाई करण्याचे सांगितले असल्याचे खा. बजरंग सोनवणे यांनी सांगितले.

### भुम-परांड्याचा तो गुंड कोण?

खा. बजरंग सोनवणे यांनी दुसऱ्या व्हिडीओमध्ये भुम-परांड्याच्या गुंडाचा उल्लेख केला आहे. तो गुंड इकडे येऊन धमकावतो, असे ते म्हणाले असून तो गुंड नेमका कोण? असा प्रश्न आता उपस्थित झाला आहे.

### सीबीआय तपासासाठी पत्र दिले- खा. बजरंग सोनवणे

बीड जिल्हा सरपंचाच्या हत्येने हादरला असून जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यावरून बीडचे खासदार बजरंग सोनवणे यांनी प्रतिक्रिया देताना थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाच लक्ष्य केले. तसेच या प्रकरणात पुणे कनेक्शन असल्याचे सांगून आपण संसदेच्या सचिवांना या प्रकरणाची सीबीआय चौकशी करण्याची मागणी एका पत्राद्वारे केली असल्याचे खा. बजरंग सोनवणे यांनी सांगितले. शिंदे साहेब मुख्यमंत्री असताना असे झाले नव्हते, असे म्हणत सोनवणे यांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाच टोला लगावला आहे.

## स्विफ्ट कार-ट्रकचा भीषण अपघात; चार ठार, दोन जखमी

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**मित्राची पोलीस मध्ये निवड झाल्यामुळे जेवणाच्या पार्टीसाठी गेलेले मित्र परत येत असताना स्विफ्ट कार व ट्रकचा समोरासमोर अपघात होऊन यात तिघेजण जागीच ठार तर एकाचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची घटना घडली असून दोघेजण जखमी आहेत.या घटनेने एकच हळहळ व्यक्त होत कार्यपर गावावर शोककळा पसरली आहे.**



मित्राची पुणे येथे पोलीस मध्ये निवड झाल्यामुळे आनंदासाठी स्नेही भोजनाचे आयोजन केले होते. रेनापुर तालुक्यातील कार्यपूर या गावचे मित्र सोमवार रात्री जेवणासाठी मांजरसुंबा जवळ गेले होते. तेथे जेवण करून पहाटे मांजरसुंबा येथील ब्रिज खाली शेकोटी करून चार

◀◀ पान २ वर

## मुंडे साहेबांना अभिवादन करण्यासाठी उद्या गोपीनाथ गडावर उसळणार अलोट गर्दी


**आ.पंकजाताई मुंडे, डॉ.प्रीतमताई मुंडे यांची उपस्थिती; आपापल्या गावात, वॉर्डात जयंती साजरी करा**

**परळी वै. । प्रतिनिधी**

लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करण्यासाठी येत्या १२ डिसेंबर रोजी गोपीनाथ गडावर राज्याच्या कानाकोपर्यातून मोठी गर्दी उसळणार आहे. भाजपच्या राष्ट्रीय सचिव आ. पंकजाताई मुंडे, माजी खासदार डॉ.प्रितमताई मुंडे यावेळी उपस्थित राहणार आहेत. दरम्यान आपापल्या गावात, वॉर्डात जयंती साजरी करा तसेच मुंडे साहेबांचे संस्कार जिवंत ठेवण्यासाठी सदैव कार्यरत राहण्याचे वचन द्या असं आवाहन आ. पंकजाताईंनी केलं आहे.

यासंदर्भात आ. पंकजाताई मुंडे यांनी सोशल मीडियातून राज्यभरातील कार्यकर्त्यांना महत्वाचा संदेश दिला आहे, त्या म्हणाल्या, विधानसभा निवडणुकीत मराठवाड्यात

◀◀ पान २ वर



## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.१० डिसेंबर २०२४**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ६.५० क्विंटल | २,००१ | २,९११ | २,४५६ |
| ज्वारी/हायब्रिड : ३५.०० क्विंटल | १,८०० | २,७३१ | २,१८७ |
| मका/लोकल: ७.०० क्विंटल | २,१५० | २,१५० | २,१५० |
| तूर : ३.०० क्विंटल | ७,६०० | ७,६०० | ७,६०० |
| उडीद : २२.०० क्विंटल | ४,९०० | ७,४६० | ६,२३८ |
| बाजरी: ९.०० क्विंटल | २,८४१ | ४,५५१ | ३,६२३ |
| मुग : ४.५० क्विंटल | ४,८०१ | ७,४९६ | ६,४९९ |
| सोयाबीन: ८१.०० क्विंटल | ३,९०० | ४,१०० | ४,०३६ |
| हरभरा: २.०० क्विंटल | ४,४०१ | ६,८०१ | ५,४०१ |

# काँग्रेसकडून राज्यसभा सभापतींविरुद्ध अविश्वास ठराव

## ७२ वर्षांच्या इतिहासात पहिल्यांदाच प्रस्ताव दाखल

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

**राज्यसभेच्या इतिहासात पहिल्यांदाच एखाद्या सभापतीविरुद्ध अविश्वास प्रस्ताव राज्यसभा सचिवालयाकडे सादर करण्यात आला आहे. याआधीही अनेकदा विरोधकांची याविषयी कुजबुज झाली होती, मात्र पहिल्यांदाच सभापती जगदीप धनखड यांच्या कामावर नाराजी व्यक्त करत विरोधकांनी अविश्वास प्रस प्रस्ताव सभागृहात मंजूर होणार नाही, हे विरोधकांनाही माहीती आहे. मात्र या काळात सभापतींच्या कृतीवर बोट दाखवण्याची मोठी संधी विरोधकांना मिळणार आहे. दरम्यान, हा प्रस्ताव सोमवारीच दाखल करण्यात येणार होता मात्र सोनिया गांधींनी एक दिवस थांबायला सांगितले. त्यामुळे मंगळवारी (दि.१०) हा प्रस्ताव दाखल करण्यात आला आहे.**

राज्यसभेत सत्ताधारी पक्ष आणि विरोधक यांच्यात सुरू असलेल्या गतिरोधादरम्यान,



इंडिया अलायन्सने मंगळवारी जगदीप धनखड यांच्याविरोधात अविश्वास ठराव मांडला. काँग्रेस, तृणमूल काँग्रेस, राजद, सपा, द्रमुक, आम आदमी पार्टीसह विरोधी आघाडीच्या ६० हून अधिक सदस्यांनी अविश्वास प्रस्तावाच्या सूचनेवर स्वाक्षऱ्या केल्या. हा प्रस्ताव राज्यसभेचे सरचिटणीस पी. सी. मोदी यांच्याकडे सादर करण्यात आला. राज्यसभा सचिवालय आता या प्रस्तावाची तांत्रिकदृष्ट्या पडताळणी करणार आहे. या प्रस्तावात काही त्रुटी असल्यास तो फेटाळलाही जाऊ शकतो. काही त्रुटी आढळल्या नाहीत तरच सदर प्रस्ताव चर्चेसाठी स्वीकारले जाईल. सध्या सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनात या प्रस्तावावर चर्चा होण्याची फारशी शक्यता नाही, असे विरोधकांनी गृहीत धरले आहे मात्र विरोधक आता मागे हटण्याच्या मनस्थितीत नाहीत. हिवाळी अधिवेशनात या प्रस्तावावर चर्चा झाली नाही किंवा काही

◀◀ पान २ वर

### अविश्वास प्रस्ताव फेटाळला जाऊ शकतो

इंडिया आघाडीने राज्यसभेचे सभापती जगदीप धनकड यांच्याविरोधात अविश्वास प्रस्तावाची नोटीस दिली असली तरी तांत्रिक कारणामुळे ही नोटीस फेटाळली जाण्याची शक्यता आहे. विरोधकांनी संविधानाच्या कलम ६७ (बी) अंतर्गत अविश्वास प्रस्तावाची नोटीस दिली आहे. त्यासाठी किमान ५० खासदारांच्या सह्या आवश्यक आहेत. नोटीसवर विरोधी पक्षांच्या ६० हून अधिक सदस्यांच्या सह्या आहेत. अविश्वास प्रस्तावाची नोटीस राज्यसभा सचिवालयाला किमान १४ दिवस अगोदर देण्याचा नियम आहे. विरोधकांनी मंगळवारी १० डिसेंबर रोजी राज्यसभा सचिवालयाला ही नोटीस दिली आहे. २५ नोव्हेंबरपासून सुरू झालेल्या या हिवाळी अधिवेशनाचा कालावधी २० डिसेंबरला संपत आहे. या परिस्थितीत अधिवेशन कालावधी केवळ १० दिवस उरला आहे. त्यामुळे या कारणासह राज्यसभा सचिवालय अविश्वास प्रस्तावाची सूचना फेटाळू शकते.

cmyk

## अग्रलेख

# संसदीय थट्टा थांबवून सरकारने चर्चा करावी

संसदेच्या सध्या सुरू असलेल्या अधिवेशनाचा मंगळवारचा दिवसही कामकाज न होता गोंधळातच आटोपता घ्यावा लागला. या अधिवेशनात आतापर्यंत अपेक्षित असे कोणतेच कामकाज होऊ शकलेले नाही. विरोधी पक्षाने त्यांच्या परीने त्यांचे मुद्दे पहिल्या दिवसापासून लावून धरले. पण त्यातील कोणत्याच मुद्द्यावर चर्चा करायची नाही या भूमिकेवर सरकार ठाम राहिले. त्यातूनच ही गोंधळाची स्थिती निर्माण झाली आहे. काही वेळा तर असे अनुभवाला आलेले दिसले की सरकारलाच हे अधिवेशन चालवण्यात फारसे स्वारस्य नाही. सोमवारी राज्यसभेत बोलताना मल्लिकार्जुन खर्गे यांनी तसा स्पष्ट आरोप देखील केला आहे. त्यातून ज्या उखाळ्या पाखाळ्या सध्या सुरू झाल्या आहेत त्या पाहता संसद अधिवेशनाची थट्टाच होताना दिसते आहे, जे दुर्दैवी ठरत आहे. अदानीच्या मुद्द्यावर काँग्रेस पहिल्या दिवसापासून आक्रमक आहे. पण त्यांना एकदाही अदानी विषयावर चर्चा उपस्थित करायला अनुमती मिळाली नाही.

काँग्रेस खासदार अधिकच आक्रमक भूमिकेत दिसत आहेत. सोमवारी एक अनोखा प्रयोग करीत, अदानी आणि मोदी संबंधाची खिल्ली उडवताना दोन खासदारांनी मोदी आणि अदानीचे मुखवटे चेहऱ्यावर लावले. त्यापैकी अदानीची मुलाखत राहुल गांधी संसदेच्या आवारात घेताना दिसले. उपरोधिकपणे अदानी प्रकरणात निषेध नोंदवण्याचा एक आगळा प्रयत्न होता. संसदेत जर आम्हाला या विषयावर बोलू देत नसाल, तर संसदेच्या बाहेर आम्ही आमच्या परीने हा विषय लावून धरू आणि लोकांचे या विषयावर लक्ष केंद्रित करू असा संदेश यातून काँग्रेसने दिला आहे. दुसरीकडे मंगळवारी 'मोदी-अदानी भाई-भाई' असे लिहिलेली बॅग घेऊन खा.प्रियंका गांधी संसदेत आल्या होत्या. मात्र, असे असले तरी केवळ अदानी या विषयावर काँग्रेसला साथ देण्यात इंडिया आघाडीतील बाकीचे पक्ष राजी नाहीत. समाजवादी पक्षाला संबळ दंगल प्रकरणाचा मुद्दा लावून धरायचा आहे. त्यावरून समाजवादी पक्षाच्या खासदारांनी गदारोळ सुरू केला आहे. विरोधकांच्या या सततच्या आक्रमक भूमिकेच्या पार्श्वभूमीवर राज्यसभेत मागच्या आठवड्यात वेगळेच नाट्य रंगले. अभिषेक मनु सिंघवी यांच्या सीटच्या खाली नोटांची बंडले सुरक्षा अधिकाऱ्यांना सापडली. हा मुद्दा सनसनाटी बनवण्याचा सरकारी पक्षाचा इरादा होता; परंतु त्यात त्यांना फार यश आले नाही. संसदेतील सध्याच्या प्रचलित वादावरचे लक्ष विचलित करण्याचा सरकारचा हा डाव होता, असे विरोधी पक्षांचे म्हणणे आहे; परंतु हा डाव फेल गेल्यानंतर सोमवारी भारतीय जनता पक्षाच्या सदस्यांनी जॉर्ज सोरोस यांचा विषय उपस्थित करून काँग्रेसला घेरण्याचा प्रयत्न केला. केंद्रीय मंत्री व भाजपचे अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी त्या अनुषंगाने बॅटिंग केली. त्यांना राज्यसभेचे अध्यक्ष धनखड यांनी सविस्तर बोलू दिले, पण त्याला उत्तर देण्यासाठी उभे राहिलेले मल्लिकार्जुन खर्गे यांच्या भाषणात मात्र खुद्द अध्यक्षांनीच वारंवार अडथळे आणल्याचे पाहायला मिळाले. तसे पाहिले तर या जॉर्ज सोरोस प्रकरणात काडीचाही दम दिसत नाही. मुख्य मुद्दा असा आहे की जर देशातील अदानी नावाच्या एका उद्योगपतीवर केवळ देशातूनच नव्हे तर संपूर्ण जगभरातून आरोप होत असतील तर या प्रकरणावर देशाच्या सर्वोच्च सभागृहात एकदा सविस्तर चर्चा व्हायलाच हवी आहे. सरकार ही चर्चा का घडू देत नाही, यामागे त्यांचे नेमके हित काय आहे असे प्रश्न या निमित्ताने उपस्थित होतात. सरकारने अन्यही महत्त्वाच्या मुद्द्यांवर संसदेत चर्चा करायला कायमच नकार घंटा दिली आहे. जयराम रमेश यांनी चीन प्रकरणावरून पुन्हा एकदा राज्यसभेत सवाल उपस्थित केले. त्याप्रकरणीही सरकारला चर्चा करायची इच्छा नाही. उत्तर प्रदेशात संबळ येथे जी दंगल झाली ती दंगल त्या राज्यातील सरकारच्या खोडसाळपणामुळेच झाली असा जर समाजवादी पक्षाचा आरोप असेल तर त्यावरही चर्चा होऊ द्यायला हवी होती. पण तेथेही सरकारने नकार घंटा वाजवली.

पंजाब सीमेवर आंदोलनाला बसलेल्या शेतकऱ्यांचा विषयही संसदेत चर्चेला घेतला जात नाही. त्यावर सातत्याने मागणी करूनही विरोधी पक्षनेत्यांचे प्रस्ताव फेटाळले जातात. विरोधकांचा वेगळा अजेंडा आणि सरकारची वेगळी भूमिका या वादातून संसदेपुढील चर्चेचे सगळे महत्त्वाचे विषय बाजूला पडल्याचे पुन्हा एकदा पाहायला मिळत आहे. त्यामुळे संसद अधिवेशन हा विषय, थट्टेचा विषय बनत आहे. देशाच्या एकूण कारभारासाठी ही स्थिती चिंतेची आहे. संसद अधिवेशन सुरू व्हायच्या दिवशी, आम्ही सर्व विषयांवर चर्चा करायला तयार आहोत असे सरकार म्हणत असते. पण प्रत्यक्षात मात्र ते त्यांना नको असलेल्या विषयावर चर्चा करायला अनुमती देत नाहीत हे अजून किती काळ पहावे लागणार आहे ते कळत नाही. मात्र यामुळे प्रतिमा मलीन होत आहे, हे मात्र खरे आहे.

# रमाई आवास योजनेंतर्गत लाभार्थ्यांनी प्रस्ताव सादर करावेत-आ.संदीप क्षीरसागर

## कुठल्याही स्तरावर पैशांची मागणी झाल्यास तक्रार करण्याचेही आवाहन



**बीड । प्रतिनिधी**

**रमाई आवास घरकुल योजनेसाठी समाजकल्याण विभागाकडून नवीन उद्दीष्ट प्राप्त झाले असून निकषांची पुर्तता करणार्या लाभार्थ्यांनी आपल्या ग्रामपंचायतीच्या माध्यमातून आवश्यक कागदपत्रांसह आपले प्रस्ताव दाखल करण्याचे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.**

रमाई आवास योजना (ग्रामीण) या अनुसुचित जाती व नवबौद्ध घटकातील लोकांसाठी असलेल्या घरकुल योजनेसाठी समाजकल्याण विभागाकडून बीड विधानसभा मतदारसंघ क्षेत्रातील बीड तालुक्यासाठी ७२० व शिरूर-कासार तालुक्यासाठी २४० इतके उद्दीष्टांना मंजुरी दिली आहे. याअनुषंगाने समाजकल्याण विभागाकडून पंचायत समितीमार्फत निकष पात्र लाभार्थ्यांकडून अर्ज, प्रस्ताव मागविण्यात आले आहेत. त्यामुळे निकषांची पुरवण्या करणार्या अनुसुचित जाती व नवबौद्ध घटकातील पात्र लाभार्थी यांनी आपले अर्ज ग्रामपंचायतीच्या माध्यमातून सदरील योजनेसाठी दाखल करावेत असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.

### पैशांची मागणी झाल्यास संपर्क करा

दरम्यान आ.संदीप क्षीरसागर यांनी रमाई आवास योजनेच्या प्रक्रियेत कुठल्याही स्तरावर पैशांची मागणी किंवा आर्थिक गैरव्यवहार झाल्यास मो.नं.९७६६२७२७२४, ९३७३६०३११९ या संपर्क क्रमांकांवर संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

# लोक जनशक्ती पार्टीच्या केज तालुकाध्यक्षपदी गंगाधर पौळ तर अंबाजोगाई तालुका उपाध्यक्षपदी सागर निरगुडे यांची निवड



**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**दलित, बहुजन व अल्पसंख्याकांच्या सामाजिक व आर्थिक प्रश्नांसाठी न्याय मिळवून देण्यासाठी लढणारा पक्ष म्हणून लोक जनशक्ती पार्टीची संपूर्ण देशात सर्वदूर ओळख आहे. लोक जनशक्ती पार्टी व दलित सेनाचे संस्थापक नेते दिवंगत माजी केंद्रीय मंत्री रामविलासजी पासवान यांच्या प्रेरणेने व सामाजिक व राजकीय क्षेत्रात कार्य करीत असलेल्या लोक जनशक्ती पार्टीच्या मराठवाडा प्रदेशाध्यक्ष राजेश वाहुळे यांनी मागील काही वर्षांपासून मराठवाडा विभागात लोक जनशक्ती पार्टीला संघटनात्मक दृष्टीने अधिक बळकट करून पक्षाचा सर्वदूर विस्तार करण्याचे काम करीत आहेत. याचाच एक भाग म्हणून केज तालुकाध्यक्षपदी गंगाधर अंबादास पौळ तर अंबाजोगाई तालुका उपाध्यक्षपदी सागर निरगुडे यांची निवड केली आहे. निष्ठावंत कार्यकर्ते गंगाधर पौळ व सागर बंडू निरगुडे यांच्या निवडीचे सर्वस्तरांतून स्वागत होत आहे.**

लोक जनशक्ती पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा देशाचे अन्न, प्रक्रिया खात्याचे कॅबिनेट दर्जाचे मंत्री चिरागजी पासवान, युवा राष्ट्रीय अध्यक्ष प्रणव कुमार, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष मोहन अनमोलू यांच्या आदेशावरून लोक जनशक्ती पार्टीच्या मराठवाडा प्रदेशाध्यक्षपदी राजेश बालाजी वाहुळे व बीड जिल्हाध्यक्ष अशोक काळे यांच्या हस्ते केज तालुकाध्यक्षपदी गंगाधर पौळ तर अंबाजोगाई तालुका उपाध्यक्षपदी सागर निरगुडे यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. नियुक्तीपत्रात केज व अंबाजोगाई तालुक्यात पक्ष बळकटीसाठी संघटन मजबूत व व्यापक करण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करून दलित, बहुजन व अल्पसंख्याकांच्या सामाजिक व आर्थिक प्रश्नांसाठी न्याय मिळवून देण्याकरिता सदैव प्रयत्नशील रहावे, आपण केलेल्या कामाचा आढावा दर दोन महिन्यांनी पक्षाच्या कार्यालयात सादर करावा अशी अपेक्षा व्यक्त करून निवडीबद्दल पौळ आणि निरगुडे यांचे अभिनंदन करण्यात आले आहे. यावेळी बीड जिल्हाध्यक्ष अशोक काळे, प्रदीप घुंडरे (अंबाजोगाई शहराध्यक्ष लोक जनशक्ती पार्टी युवा.), आदित्य चौरे (अंबाजोगाई विद्यार्थी तालुकाध्यक्ष.), दिनेश धाट, विशाल शेवाळे (परळी तालुकाध्यक्ष) तसेच अर्जुन बरले, नागनाथ ढगे, सुशिल ढवारे, अभिषेक पवार, कैलास मस्के, किरण घुमरे, अरबाज पिंजारी, लखन पौळ, सत्यजित पौळ, अभिषेक पौळ, राया शिंदे यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

लोक जनशक्ती पार्टीला संघटनात्मकदृष्ट्या बळकट करणार राष्ट्रीय अध्यक्ष तथा देशाचे अन्न, प्रक्रिया खात्याचे कॅबिनेट दर्जाचे मंत्री चिरागजी पासवान, युवा राष्ट्रीय अध्यक्ष प्रणव कुमार, युवा प्रदेशाध्यक्ष मोहन अनमोलु यांच्या नेतृत्वाखाली यापुढील काळात ही दलित, बहुजन व अल्पसंख्याकांच्या सामाजिक व आर्थिक प्रश्नांची सोडवणूक करून त्यांना न्याय मिळवून देण्याकरिता सदैव प्रयत्नशील राहूत. युवकांना संधी दिली जाईल. संघटनेच्या सर्व आजी - माजी ज्येष्ठ व युवा पदाधिकाऱ्यांना सोबत घेऊन लोक जनशक्ती पार्टी हा पक्ष मराठवाड्यात संघटनात्मकदृष्ट्या अधिक मजबूत व बळकट करणार आहोत.

# मतदानात तफावत नाही ; निवडणूक आयोगाचा खुलासा

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील विधानसभा निवडणुकीचा निकाल लागला आहे. महायुती सत्तेत आली असून महाविकास आघाडी विरोधात बसली आहे. तर ईव्हीएम मशिन आणि व्हीव्हीपॅटच्या मोजणीवरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये जुंपली आहे. विशेष अधिवेशनात देखील हा विषय गाजला असून विरोधकांनी मारकडवाडीच्या ग्रामस्थांच्या बॅलेट पेपरवरील मतदानाचा मुद्दा उचलून धरला होता. पण आता या वादावर निवडणूक आयोगानेच स्पष्टीकरण दिले आहे. आयोगाने ईव्हीएम मशीमध्ये आणि व्हीव्हीपॅट मशिनमधील मोजणीत कुठेही तफावत नसल्याचे स्पष्ट केले आहे.

मारकडवाडी गावातील ग्रामस्थांनी ईव्हीएमवर अक्षेप घेत बॅलेट पेपरची मागणी केली होती. तर नवनियुक्त आमदार उत्तमराव जानकर यांनी देखील पोटनिवडणूक बॅलेट पेपरवर होणार असेल तर आपण राजीनामा देण्यास तयार असल्याचे जाहीर केले होते. यानंतर भाजपने मंगळवारी येथे उत्तर सभा घेत शरद पवार यांच्यासह काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्यावर टीका केली. माजी आमदार राम सातपुते, आमदार गोपिचंद पडळकर आणि आमदार सदाभाऊ खोत यांनी मविआवर टीका केली. तर मारकडवाडी गावातील ग्रामस्थांचा ईव्हीएमवर अक्षेप नसून त्यांचा बळी घेतला जात असल्याचा दावा त्यांनी केला. दरम्यान, आता ईव्हीएमच्या मुद्द्यावरून निवडणूक आयोगाने एक पत्रक जारी केले आहे. या पत्रकात आयोगाने मतमोजणी प्रक्रियेतील व्हीव्हीपॅटच्या मतमोजणीत कोणतीच तफावत नसल्याचे म्हटले आहे. आयोगाने राज्यातील विधानसभा निवडणुकांच्या मतमोजणीवेळी भारतीय निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार प्रत्येक विधानसभा मतदारसंघ/विधानसभा विभागातून ५ मतदान केंद्रांची निवड करण्यात आली होती. आयोगाने निवडलेल्या या ५ मतदान केंद्रांच्या व्हीव्हीपॅट स्लिपची मोजणी करणे अनिवार्य होते. त्यानुसार, मोजणी करण्यात आली होती. ज्यात तफावत आढळलेली नाही.

# महाविद्यालयीन तरुणीची आत्महत्या

## ४ जणांविरुद्ध गुन्हा दाखल; आज अंबड बंद



**अंबड। प्रतिनिधी**

**शहरातील शारदानगरसमोरील मुंदडा कॉम्लेक्सच्या बाजुला राहत असलेल्या भाग्यश्री सुरेश घाडगे (वय १६ वर्षे) या महाविद्यालयीन तरुणीने छेडछाडीला कंटाळून आज (ता.१०) मंगळवारी ९ वाजेच्या सुमारास राहत्या घरी गळफास लावून आत्महत्या केली.या प्रकरणी आत्महत्येस प्रवृत्त केल्यावरून ४ जणांविरुद्ध अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. परंतु दामिनी पथक यांनी कारवाई केली असती तर सदरील घटना घडली नसती असे काही तज्ञ कडून बोलल्या जात आहे. दामिनी पथक कुठे आहे तिचे चर्चा जिल्हाभरात सुरू आहे याप्रकरणी पोलीस अधीक्षक यांनीही तत्काळ लक्ष देणे गरजेचे आहे. तसेच या प्रकरणी आज अंबड शहर बंद ठेवण्यात येणार आहे अशी माहिती व्यापारी महासंघाचे अध्यक्ष द्वारकादास जाधव यांनी माहिती दिली आहे. तसेच ते म्हणाले की निवेदन देण्याकरता दुपारपर्यंत अंबड बंद ठेवण्यात येणार आहे अशी माहिती व्यापारी महासंघाचे अध्यक्ष द्वारकादास जाधव यांनी दिली आहे.**

या घटने बाबत अधिक माहिती अशी की,शारदा नगर समोर मुंदडा कॉम्लेक्सच्या राहत असलेल्या भाग्यश्री सुरेश घाडगे हिला सोहम मिंधर व दुर्गेश एकनाथ चित्रे यांनी मागील अनेक वर्षांपासुन तिचे फोटो व व्हिडीओ काढुन सोशल मिडीयावर व्हायरल करेल अशी धमकी देवुन त्रास देत होते. त्यामुळे भाग्यश्री हिने सोहम विरोधात अंबड पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल केला. आत्महत्या करण्या अगोदर एकाच आरोपी विरुद्ध तक्रार होती अशी माहिती पोलीस उपनिरीक्षक आदिनाथ ढाकणे यांच्याकडून कळविण्यात आले आहे.दरम्यान नमुद गुन्हा मागे घ्यावा म्हणुन यातील सोहमचे वडिल बळीराम मिंधर व बळीराम मिंधर यांची पत्नी यांनी फिर्यादी व मयत मुलगी भाग्यश्री हिस घरी येवुन धमकावले. सोहम मिंधर,बळीराम मिंधर, बळीराम मिंधर याची पत्नी सर्व राहणार बाचेगाव तालुका घनसावंगी. हल्ली मुक्काम अंबड, व दुर्गेश चित्रे व (सर्व रा.अंबड) यांच्या त्रासाला कंटाळुन भाग्यश्री सुरेश घाडगे ही आत्महत्येस प्रवृत्त झाली. या प्रकरणी मयत मुलीचे वडिल सुरेश बालाजी घाडगे यांच्या फिर्यादीवरून अंबड पोलीस ठाण्यात वरील ४ जणांविरुद्ध कलम १०८,३ (५) भा.न्या.संहीता २०२३ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या घटनेचा अधिक तपास सहायक पोलीस निरीक्षक गुरले हे करत आहेत.



# सिध्दीच्या कन्यादानास उडानचा हातभार!

जालना । प्रतिनिधी

मोल मजुरी करून संसाराचा गाडा हाकणाऱ्या लोंढे कुटुंबातील सिद्धीच्या कन्यादानास येथील ग्रुपने मोलाचा हातभार लावला आहे.

नवीन मोंढा जवळील रॉयल नगर भागात वास्तव्यास असलेल्या ग्रुपच्या सदस्या सौ. अनिता लोंढे ह्या शिवणकाम करतात. त्यांची कन्या सिद्धीचा गुरूवारी ( ता. १२) विवाह सोहळा होत आहे. सिद्धीच्या कन्यादानास ग्रुपच्या वतीने हातभार लावावा अशी संकल्पना कीर्ती अग्रवाल यांनी सदस्यांसमोर मांडली. सर्व सदस्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत आपापल्या परीने सहाय्य केले. मिक्सर, साड्या, पर्स ,ज्वेलरी, बेडशीट, सुटकेस ,बॅग, संसार भांडे, अशा विविध वस्तूंसह रोख रक्कमेचा आहेरही केला. हळदीच्या पूर्वसंध्येस मंगळवारी ( ता. १०) कन्यादान साहित्य देण्यात आले. यावेळी संस्थापिका कीर्ती अग्रवाल, सुनिता गोरंट्याल , शशी अग्रवाल ,मंगल बांगड, शितल गट्टाणी, निर्मला करवा, साधना करवा ,सुनीता टेकवाणी, उमा पित्ती, सोनल जैस्वाल, नवनीत सद्गुरे, सुनीता निंबाळकर, आदींची उपस्थिती होती. मदतीचा हात मिळाल्याबद्दल सिध्दी आणि अनिता लोंढे ह्या भावना विवश झाल्या .तथापि कष्टकरी महिलांचा उडान ग्रुपच्या कुटुंबातील लेकीच्या कन्यादानास सदस्यांनी स्वयंस्फूर्तीने सहकार्य केल्याबद्दल समाधान व्यक्त केले.

## पान १ वरून...

### १४ डिसेंबरला मंत्रीमंडळाची

आले असल्यामुळे मुख्यमंत्री फडणवीस यांनी रविवारी रात्री शिंदे आणि अजित पवार यांच्याशी चर्चा केली. नागपूर येथे होणाऱ्या विधिमंडळाच्या अधिवेशनासाठी भाजप, शिंदे गट आणि अजित पवार गटाच्या काही मंत्र्यांचा शपथविधी करण्याचा प्रयत्न सुरू आहे. मंत्रिमंडळ विस्ताराबाबत या तिन्ही नेत्यांची एकवाक्यता असली तरी खातेवाटपावरून वाद आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे अजूनही गृह खात्यासाठी आग्रही असले तरी गृह खाते हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडेच राहणार असल्याचे शिंदे यांना स्पष्ट सांगण्यात आले आहे. त्यामुळे आता नगरविकास खात्यासाठी शिंदे आग्रही आहेत. गेली पाच वर्षे शिंदे यांच्याकडे नगरविकास खाते आहे. मात्र, या खात्याच्या कारभारावरून मुंबईतील अनेक विकासकांनी भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाकडे तक्रारी केलेल्या आहेत. विशेषत: शिंदे यांचे निकटवर्तीय बिल्डर अजय आशर यांच्या कारनाम्याबाबतही भाजपच्या वरिष्ठ वर्तुळात चर्चा सुरू आहे. त्यामुळे नगरविकास खाते शिंदे यांना द्यायचे की नाही, याचा निर्णय भाजपचे केंद्रीय नेतृत्व घेणार आहे. दरम्यान, शिंदे यांनी शिवसेनेच्या आमदारांच्या कामगिरीचे रिपोर्ट कार्ड मागवून घेतले होते. त्या आधारे शिवसेनेच्या ५ आमदारांचे मंत्रिपद निश्चित मानले जात आहे. अजित पवार यांच्यासमोर मात्र मंत्रिपदापासून वरिष्ठ नेत्यांना कसे वगळायचे असा प्रश्न आहे.

**अन्यथा थेट नव्या वर्षांत होणार विस्तार**

१४ डिसेंबरला विस्तार झाला नाही तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री शिंदे आणि पवार हे तिघेच हिवाळी अधिवेशन चालवतील. आणि विस्तार जानेवारीत केला जाईल, अशी शक्यता वर्तवली जात आहे.

**मलईदार खात्यासाठी शिंदेंचा आग्रह**

ऊर्जा, सार्वजनिक बांधकाम, सार्वजनिक उपक्रम, उद्योग, गृहनिर्माण, आदी मलईदार खाती शिंदे यांनी मागितली आहेत. महिला व बाल कल्याण खात्यासाठी शिंदे आग्रही आहेत. लाडकी बहीण योजना या खात्यामार्फत राबविल्याने शिंदे यांना हे खाते हवे आहे. तथापि, सार्वजनिक बांधकाम, सार्वजनिक उपक्रम ही खाती एकत्र करून शिंदे यांना देण्यास भाजप तयार आहे. तसेच महसूल खाते शिंदे यांना देण्यास भाजप राजी आहे.

---------

### आता १४ डिसेंबरला शेतकरी

यापूर्वी, संयुक्त किसान मोर्चा (गैर-राजकीय) आणि किसान मजदूर मोर्चाच्या बॅनरखाली १०१ शेतकऱ्यांच्या गटाने ६ आणि ८ डिसेंबर रोजी पायी दिल्लीला जाण्याचा दोनदा प्रयत्न केला होता, परंतु हरयाणाच्या सुरक्षा कर्मचाऱ्यांनी त्यांना पुढे जाऊ दिले नाही. ८ डिसेंबर रोजी शेतकरी आणि सुरक्षा दलांमध्ये संघर्षासारखी परिस्थिती निर्माण झाली. त्यानंतर शेतकऱ्यांना मागे हटवण्यासाठी अश्रुधुराच्या नळकांड्या फोडण्यात आल्या. यावेळी अनेक शेतकरी जखमीही झाले. त्यानंतर शेतकऱ्यांचा दिल्लीकडे निघणारा मोर्चा तात्पुरता स्थगित करण्यात आला होता.

-----------

### सरपंचाच्या खुनानंतर केजमध्ये

गावातील शिवराज देशमुख हा त्यांची कार चालवत होता. डोणगाव फाट्याच्या पुढील टोलनाक्याच्या डाव्या बाजूच्या शेवटच्या लाइनमधून कार जात होती. त्याचवेळी रस्त्याच्या मधोमध हल्लेखोरांनी स्कॉर्पिओ (एम. एच. ४४ झेड. ९३३३) आडवी लावली. स्कॉर्पिओतून उतरलेल्या सहा हल्लेखोरांपैकी एकाने कारच्या दरवाजाची काच दगडाने फोडली. नंतर कारच्या डाव्या बाजूला जाऊन सरपंच संतोष देशमुख यांना खाली ओढून काठीने मारहाण केली. त्यांना बळजबरीने स्कॉर्पिओत बसवून अपहरण केले. ही जीप सुदर्शन घुले (रा.टाकळी ता. केज) यांची असल्याचे निष्पन्न झाले. या प्रकरणी सुदर्शन घुले व इतर ५ जणांवर अपहरणाचा गुन्हा दाखल होता. त्यानंतर काही तासांनी संतोष देशमुख यांचा मृतदेह आढळून आल्याने त्यांचा खून झाल्याचे दिसून आले. त्यामुळे अपहरणानंतर खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. या घटनेनंतर बीड जिल्हा हादरुन गेला.

घटनेच्या दुसऱ्या दिवशी मृतांच्या नातेवाईकांनी आणि गावकऱ्यांनी आरोपींना अटक करुन फाशी देण्याच्या मागणीसाठी अहिल्यानगर-अहमदपुर मार्गावर रास्तारोको केला. यावेळी आंदोलनाला हिंसक वळण आल्याने काही काळ आंदोलनकर्ते आणि पोलिस आमने-सामने आले होते. यावेळी जमावाने एसटी बस पेटवून देत आपल्या भावना व्यक्त केल्या. यावेळी अप्पर पोलिस अधिक्षक सचिन पांडकर, सहायक पोलिस अधीक्षक चेतना तिडके, दिंद्रुड ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक आण्णाराव खोडेवाड, उपनिरीक्षक ज्ञानेश्वर धोत्रे यांच्यासह बीड शहर ठाण्याचे पोलिस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ हे उपस्थित होते. यावेळी श्री. बल्लाळ यांनी आंदोलनकर्त्यांना शांत राहा असे सांगून पोलिसांनी काय कारवाई केली हे सांगत सहकार्य करण्याचे आवाहन केले.

-----------

### मस्साजोग प्रकरणात शासन-प्रशासनाने

करण्याचा प्रयत्न केला आहे. पवनचक्की संदर्भाने बीड जिल्ह्यात कायदा आणि सुव्यवस्था संदर्भाने मोठा प्रश्न निर्माण होत आहे. याबाबत शासन आणि प्रशासनाने योग्य पाऊले घेऊन कारवाई करावी. यासोबतच गुन्हेगारी प्रवृत्तीला आळा घालण्यासाठी निष्पक्ष पवित्रा घ्यावा अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी केली आहे. यासंदर्भात आ.क्षीरसागर यांनी मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री, मुख्य सचिव, विभागीय आयुक्त, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण चे महासंचालक, जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक यांच्याकडे पत्रव्यवहार केला आहे.

----------

### मुंडे साहेबांना अभिवादन करण्यासाठी उद्या

महायुतीला अभूतपूर्व असं यश मिळालं आहे. या यशाबद्दल १२ डिसेंबरला मुंडे साहेबांच्या जयंतीनिमित्त महायुतीच्या सर्व आमदारांचा सत्कार तसेच मुख्यमंत्री आणि उप मुख्यमंत्री यांना गोपीनाथ गडावर निमंत्रित करण्याची माझी इच्छा होती. परंतू शपथविधीच्या अनिश्चित तारखांमुळे हे होऊ शकत नाही. असा कार्यक्रम जंगी मी नंतर भविष्यात घेईलच. परंतू सध्या मुंडे साहेबांची जयंती अत्यंत साध्या पध्दतीने साजरी करण्याचा निर्णय मी घेतला असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

**मुंडे साहेबांचे संस्कार जिवंत ठेवण्यासाठी सदैव कार्यरत रहा**

पुढे बोलतांना आ. पंकजाताई म्हणाल्या, १२ डिसेंबरला मी सकाळी ११ वा. गोपीनाथ गडावर येईल. सकाळी ११ ते दुपारी २ वा. दरम्यान गडावर नेहमीप्रमाणे कार्यक्रम होतील. ज्यांना यादिवशी यायला जमणार नाही, त्यांनी परंपरेप्रमाणे आपापल्या गावांमध्ये, वॉर्डामध्ये मुंडे साहेबांची जयंती साजरी करावी व त्यांना अभिवादन करावे आणि मुंडे साहेबांचे संस्कार जिवंत ठेवण्यासाठी सदैव कार्यरत राहण्याचं वचन द्यावे असे आवाहन केले आहे.

---------

### स्विफ्ट कार-ट्रकचा भीषण

वाजता स्विफ्ट कार क्रमांक एम एच १४, एल एल ६७४९ मांजरसुंबा येथून निघून पुढे आंबेजोगाई कारखाना मार्गे रेणापूरकडे जात असताना वाघाळापाटी येथे समोरून येणाऱ्या ट्रकला समोरासमोर शिफ्ट कारची धडक झाल्यामुळे कारचा चुराडा होत शिफ्ट कार मधील तिघेजण जागेवरच ठार झाले .यात मयत बालाजी शंकर माने वय २७,फारुख बाबुमिंया शेख वय ३०,दिपक दिलीप सावरे वय २८ , ऋतवीक गायकवाड (रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू)यातील जख्मी मुबारक शेख,अजिम पाशुभाई शेख ३० वय (पोलीस निवड) स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात उपचार सुरू आहेत. अपघाताची माहिती मिळताच आंबेजोगाई ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक पडवळ पोलीस कर्मचारी नाना राऊत व त्यांच्या इतर सहकाऱ्यांनी धाव घेत जखमेवर तात्काळ रुग्णालयात हलवले असून त्यांच्यावर उपचार होत आहे. शवविच्छेदनासाठी मृतदेह स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात आणले आहेत.

---------------

### काँग्रेसकडून राज्यसभा सभापतींविरुद्ध

कारणास्तव ती रद्द झाली, तर पुढच्या अधिवेशनात पुन्हा प्रस्ताव चर्चेला आणण्याचा निर्णय विरोधकांनी घेतला आहे. राज्यसभा सभापती जगदीप धनकड यांच्या विरोधात अविश्वास प्रस्तावाच्या ठरावाला दुजोरा देताना काँग्रेसचे सरचिटणीस खा. जयराम रमेश म्हणाले की, राज्यसभेच्या ७२ वर्षांच्या इतिहासात पहिल्यांदाच विरोधी पक्षांनी राज्यसभा सभापतींविरुद्ध औपचारिकपणे अविश्वास प्रस्ताव मांडला आहे. यावरून परिस्थिती किती वाईट झाली आहे, हे लक्षात येते.

------

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

बुधवार दि. ११ डिसेंबर २०२४



## आंतरभारतीची गुरुदास सेवा आश्रमास भेट

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

आंतरभारती शाखा अंबाजोगाईच्या वतीने दिनांक ८ डिसेंबर २०२४ रोजी घाटनांदुर येथील गुरुदास सेवा आश्रमास आधुनिक तीर्थाटन म्हणून सामाजिक प्रकल्प भेट देण्यात आली.

गुरुदास सेवा आश्रमात आंतरभारतीच्या सर्व सदस्यांनी आश्रमातील वयोवृद्धांसमवेत स्नेहभोजन घेतले. या सामाजिक प्रकल्प भेटीत वृद्धांची निवासस्थाने, उपलब्ध विविध सुविधा, परिसरातील लघु उद्योग केंद्र, भोजनगृहास भेट देण्यात आली.

आंतरभारती राष्ट्रीय कार्यकारणी सदस्य जेष्ठ पत्रकार अमर हबीब यांनी याप्रसंगी उपस्थितितांना या वयोवृद्धांशी यापुढील आयुष्यभर नाते जोपासण्यासाठी सांगितले. या सामाजिक प्रकल्प भेटीतून माणूस जाणून घेऊन आपली संवेदनशीलता जागी ठेवू असे आवाहन अमर हबीब यांनी केले. आंतरभारतीच्यावतीने डॉ. संतोष बोबडे, डॉ. सुलभा पाटील, राष्ट्रीय सेवा योजनेची प्रतिनिधी नेहा बोंडगे यांची समन्वयक म्हणून नियुक्ती करून सन्मान करण्यात आला.

# अकराव्या अंबाजोगाई साहित्य संमेलनाची तयारी पूर्ण

## उद्घाटन; दोन कवी संमेलन; दोन परिसंवाद; कथाकथन आणि समारोप अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

मराठवाडा साहित्य परिषद शाखा अंबाजोगाईच्या वतीने १४ व १५ डिसेंबर २०२४ रोजी आयोजित करण्यात आलेल्या दोन दिवसीय ११ व्या अंबाजोगाई साहित्य संमेलनाची संपुर्ण तयारी झाली असून त्याची कार्यक्रम पत्रिका निश्चित करण्यात आली असल्याची माहिती स्वागताध्यक्ष सुदर्शन रापतवार यांनी पत्रकार संवाद बैठकीत दिली.

११ व्या अंबाजोगाई साहित्य संमेलनाच्या पार्श्वभूमीवर या संमेलनाची संपुर्ण माहिती देण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार संवाद बैठकीत बोलताना स्वागताध्यक्ष सुदर्शन रापतवार यांनी पुढे सांगितले की, मसाप शाखा अंबाजोगाईच्या वतीने १९९८ अंबाजोगाई साहित्य संमेलन आयोजित करण्यात येते. यावर्षी १४ व १५ डिसेंबर रोजी होणारे हे साहित्य संमेलन एक दशक पुर्तीनंतर होणारे पहिले संमेलन आहे. त्यामुळे हे संमेलन मागील १० संमेलना पेक्षा अधिक व्यापक आणि नाविण्यपूर्ण उपक्रमांचा सहभाग करुन ते यशस्वी करण्यासाठी मी आणि संयुक्त स्वागत समितीचे सदस्य मागील काही महिन्यांपासून प्रयत्न करीत आहोत.

या संमेलनाची सुरुवात आपण ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान करणारी जागर दिंडी काढुन करण्यात येणार आहे. शालेय विद्यार्थ्यांमध्ये आणि एकुण समाजामध्ये ज्येष्ठ नागरिकांप्रति सन्मान आणि आदरभाव वाढावा ही या मागची मुळ संकल्पना आहे. छत्रपती शिवाजी महाराज चौकातून ही जगरदिंडी दुपारी ३:०० वाजता निघेल. या दिंडीत शालेय विद्यार्थी ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान करणारे फलक हातात घेवून घोषणा देत संमेलन स्थळी येतील. याठिकाणी आलेल्या ज्येष्ठ नागरिकांची हे विद्यार्थी गुलाबपुष्प देवून सत्कार करतील व त्यांना सभागृहात नेवून स्थानापन्न करतील.

या जागर दिंडीचे उद्घाटन मागील संमेलनाचे स्वागताध्यक्ष प्राचार्य बी. आय. खडकभावी हे करतील. संयुक्त स्वागत समितीचे सर्व पदाधिकारी, शिक्षक मैत्री प्रतिष्ठान चे सदस्य, वाद्यवृंद पथक व विद्यार्थी मोठ्या संख्येने या दिंडीत सहभागी होतील. या उपक्रमाचे संयोजक म्हणून सुनील व्यवहारे, कैलास चोले, नामदेव मुंडे, विजय रापतवार, विष्णू सरवदे, ॲड. आनंद जगतकर, लक्ष्मण गोरे हे असणार आहेत.

सायंकाळी चार वाजता या दोन दिवसीय अंबाजोगाई साहित्य संमेलनाचे उद्घाटन संमेलन अध्यक्ष तथा महाराष्ट्रातील प्रतिथयश लेखक

बालाजी सुतार, प्रमुख अतिथी औरंगाबाद येथील शासकीय दंत वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता तथा सामाजिक आणि साहित्य चळवळीचे भाष्यकार डॉ. शिरीष खेडगीकर, स्वागताध्यक्ष सुदर्शन रापतवार, मसाप अध्यक्ष दगडू लोमटे व संयुक्त स्वागत समितीचे सर्व सदस्य यांच्या उपस्थितीत होईल.

पुरस्कार वितरण

साहित्य संमेलनाच्या उद्घाटन कार्यक्रमात मसापच्या वतीने जाहीर करण्यात आलेल्या पुरस्कारांचे वितरण मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात येणार आहे. यामध्ये प्रख्यात कवी रचना यांना डॉ. शैला लोहिया लेखिका पुरस्कार, कथा लेखक उमेश मोहीते यांना मंदाताई देशमुख कथा लेखन पुरस्कार आणि अलीम अजित यांना प्राचार्य संतोष मुळावकर शिक्षक लेखन पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. स्मृती चिन्ह, रोख रक्कम आणि शाल व श्रीफळ असे या सन्मानाचे स्वरुप आहे.

पुस्तक प्रकाशन

या कार्यक्रमात शहर व परिसरातील ज्या साहित्यिकांना आपल्या नवीन पुस्तकांचे प्रकाशन करावयाचे असेल अशा लेखकांच्या पुस्तकांचे प्रकाशन संमेलनाध्यक्ष व व्यासपीठावरील इतर मान्यवरांच्या उपस्थितीत हे प्रकाशन करता येईल.

या उद्घाटनीय कार्यक्रमानंतर रात्री व दुसरे दिवशी विविध उपक्रमांची रेलचेल राहणार आहे.



दोन स्वतंत्र कवी संमेलनाचे आयोजन

अंबाजोगाई साहित्य संमेलनाच्या उद्घाटनीय सत्रानंतर लगेचच निमंत्रित कवींचे संमेलन आयोजित करण्यात आले आहे. या निमंत्रितांच्या कवी संमेलनानंतर खुले कवी संमेलन होणार आहे.

निमंत्रितांचे कवी संमेलन हे सायंकाळी सहा ते रात्री आठ या कालावधीत होणार आहे. या निमंत्रितांच्या कवी संमेलनाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ कवी आणि सुप्रसिद्ध गझलकार प्रा. मुकुंद राजपंखे हे असणार असून या संमेलनाच्या संयोजकाची जबाबदारी हे अश्रब पठाण यांच्या वर आहे. या निमंत्रितांच्या कवी संमेलनामध्ये रचना, निशा चौसाळकर, राजेश रेवले, विद्याधर पांडे, वंदना कोपले, पवन खरात, संध्या सोळुंके, संजय खाडप, तिलोत्तमा पतकराव, रमेश मोटे, गोविंद हाके, भगवान शिंदे, प्राचार्य अखिला गौस, सतीष घाडगे, जयश्री मुंडे, प्रा. विष्णू कावळे, प्रा. सारिका गुंडरे, अंतर हुसेन, बलराज संघई, पुष्पा बगाडे, इंदुताई पल्लेवार, कृष्णा भोकरे, शिलादेवी गायकवाड, प्रा. अर्चना कुलकर्णी यांचा सहभाग असणार आहे.

निमंत्रितांच्या कवी संमेलनानंतर लगेचच खुल्या कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. रात्री ८ ते १० या कालावधीत हे खुले कवी संमेलन होईल. या कवी संमेलनाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ कवयित्री वंदना कोपले या असणार असून या कवी संमेलनाच्या संयोजनाची जबाबदारी सुजाता भोजने आणि महंमद खाजा यांच्या वर राहणार आहे. या निमंत्रितांच्या कवी संमेलनातील सहभागी कवींची यादी किमान ५० कवींच्या पुढे असेल असे दिसते.

नव्या शैक्षणिक धोरणात भाषा शिक्षण विषयावर परिसंवाद

साहित्य संमेलनाच्या दुसऱ्या दिवशी ''नव्या शैक्षणिक धोरणात भाषा शिक्षण'' या विषयावरील परिसंवाद १५ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता आयोजित करण्यात आला आहे. या परिसंवादाचे अध्यक्षस्थान ज्येष्ठ -हदयरोग तज्ज्ञ व एक जागरुक पालक व भाषा विषयाचे अभ्यासक डॉ. सिध्देश्वर बिराजदार हे राहणार असून या परीसंवादाचे सुत्रसंचलन व संयोजना ची जबाबदारी डॉ. शशिकांत पुरी यांचेवर आहे. या परीसंवादात इंग्रजी विषयाचे अभ्यासक श्रीधर नागरगोजे, मराठी विषयाचे अभ्यासक राम शेळके आणि उर्दू विषयाचे अभ्यासक सय्यदा सालेहा जबीं या आपले नव्या शैक्षणिक धोरणात भाषा शिक्षण या विषयावर स्वतंत्र भाष्य करतील.

साहित्य संमेलनाच्या अध्यक्षांच्या साहित्यावर परीसंवाद

साहित्य संमेलनाच्या दुसरे दिवशी अंबाजोगाई साहित्य संमेलनाच्या प्रथेप्रमाणे संमेलनाचे अध्यक्ष यांच्या साहित्यावरील परी संवादाचे आयोजन करण्यात येते. यावर्षी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष बालाजी सुतार यांच्या साहित्यावरील परिसंवाद १५ डिसेंबर रोजी दुपारी १ ते ३ या कालावधीत होणार आहे. या परिसंवादाचे अध्यक्ष ज्येष्ठ पत्रकार लेखक व विचारवंत अमर हबीब हे राहणार आहेत. तर या परिसंवादाचे संयोजन व सुत्रसंचालन प्रा. रमेश सोनवळकर हे करणार आहेत. या परिसंवादात बालाजी सुतार यांनी लिहिलेल्या नाटकांवर अमृत महाजन, कथा या साहित्य प्रकारावर प्रा. शैला बरूरे, कवीता या साहित्य प्रकारावर अमर हबीब तर इतर साहित्य (संकीर्ण) या विषयावर पत्रकार श्रीकिशन काळे हे आपले भाष्य करणार आहेत. या परिसंवादाचा समारोप अमर हबीब हे करतील.११ व्या अंबाजोगाई साहित्य संमेलनाचे अध्यक्ष बालाजी सुतार हे महाराष्ट्रातील एक प्रगल्भ साहित्यिक म्हणून ओळखले जातात. त्यांनी लिहिलेल्या साहित्यावर नाटकं, चित्रपट आणि लघुपट निघत आहेत. एक दर्जेदार आणि सकस साहित्यिक म्हणून त्यांची प्रतिमा निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर त्यांच्या साहित्यावरील हा परिसंवाद संमेलनाचे मुख्य आकर्षण ठरणार आहे.

**कथा कथन** : या संमेलनात या वर्षीपासून कथा कथनाचा कार्यक्रम वाढवण्यात आला आहे. १५ डिसेंबर रोजी दुपारी ३ ते ४ या वेळेत हा कार्यक्रम आहे. या कार्यक्रमाचे स्वरुप वेगळे राहणार आहे. योगेश्वरी नुतन विद्यालयातील ऋतुराज केंद्? आणि वेणुताई चव्हाण कन्या विद्यालयातील गौरी रमेश कांबळे हे दोन विद्यार्थी आपल्या कथा सांगणार आहेत. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त मुख्याध्यापिका मंगला भुसा या राहणार आहेत. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व संयोजक प्रा. पंडीत कराड हे असतील. शालेय विद्यार्थ्यांमध्ये कथा लेखनाची व वक्तृत्व कला विकसित व्हावी म्हणून अशा पध्दतीचा वेगळा कार्यक्रम आयोजित केला आहे.

**समारोप:** या दोन दिवसीय अंबाजोगाई साहित्य संमेलनाचा समारोपीय कार्यक्रम १५ डिसेंबर रोजी सायंकाळी ४ वाजता सुरू होणार आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष संमेलन अध्यक्ष बालाजी सुतार हे असणार आहेत. यावेळी व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून आंतरराष्ट्रीय किर्तीचे प्रख्यात दंत चिकित्सक डॉ. आदित्य पतकराव, स्वागताध्यक्ष सुदर्शन रापतवार, मसाप अध्यक्ष दगडू लोमटे यांच्यासह संयुक्त स्वागत समितीचे सर्व सदस्य उपस्थित राहतील. या कार्यक्रमात अमर हबीब हे पुढील संकल्प जाहीर करणार आहेत.

विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण

या समारोपीय कार्यक्रमात ११ वे अंबाजोगाई साहित्य संमेलनाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या विविध स्पर्धांतील विजेत्यांचा, स्पर्धा संयोजकांचा आणि संमेलनाच्या यशस्वीतेसाठी गेली अनेक महीन्यापासून सतत कार्यरत असलेल्या संमेलन सजवणा-या हातांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते स्मृतिचिन्ह व गुलाब पुष्प देऊन सत्कार करण्यात येणार आहे.

या समारोपीय कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तिलोत्तमा पतकराव व प्रा.सागर कुलकर्णी हे करणार आहेत तर संयोजक अनिकेत डिघोळकर आणि शरद लंगे हे असणार आहेत.

या सर्व कार्यक्रमांस शहर व परिसरातील साहित्य व रसिक श्रोत्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन स्वागताध्यक्ष सुदर्शन रापतवार, सचीव प्रा. पंडीत कराड, उपाध्यक्ष सुभाष बाहेती, वंदना तेलंग-कोपले, मसाप चे अध्यक्ष दगडू लोमटे, सचीव गोरख शेंद्रे, उपाध्यक्ष डॉ. राहुल धाकडे व ११ वे अंबाजोगाई साहित्य संमेलनाच्या संयुक्त समितीच्या सर्व सदस्यांनी केले आहे.



भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचे विधानसभा निवडणुकीतील विजयाबद्दल अभिनंदन करून महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी दीक्षाभूमी ते मंत्रालय पत्रकार संवाद यात्रेची माहिती पुस्तिका भेट दिली. पत्रकारांच्या मागण्यांबाबत सविस्तर चर्चा करून आगामी काळात सरकारच्या माध्यमातून मागण्या पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करण्याची ग्वाही त्यांनी दिली. यावेळी पत्रकार संघाचे मंत्रालय संपर्कप्रमुख नितीन जाधव उपस्थित होते.

## माजलगावमध्ये आदमाने डेअरी पशुधन फार्मचे उद्घाटन

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील निपाणी टाकळी येथील तरुण प्रगतशील शेतकरी शरद आदमाने यांच्या आदमाने डेअरी फार्मचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते झाले.यावेळी एसबीआय बँकेचे मुख्य प्रबंधक वेम्पती शेषागिरी, मॅनेजर गौरंगा मुदुली,मॅनेजर काशिनाथ बिराजदार,निर्मण पारकर पाटील, पंचायत समिती विभागाचे डॉ. रणजित शेजुळ, डॉ.आवळे,कृषी विभागाचे पवार यांचेसहप्रगतशील शेतकरी,दुग्ध व्यावसायिक उपस्थित होते.

प्रास्ताविकात विकास आदमाने यांनी डेअरी फार्म सुरू करण्याचा उद्देश व वाटचाल कशी केली याची माहिती दिली. एसबीआयचे मुख्य प्रबंधक शेषागिरी यांनी शेतकर्यांना बँक खंबीरपणे आर्थिक सहाय्य करेल तरी जास्तीत जास्त होतकरू शेतकर्यांनी उद्योग व्यवसाय करावा असे आवाहन केले. गौरंगा मुदूली यांनी योजनेची सविस्तर माहिती दिली. बिराजदार यांनी बँकेच्या अनेक नियमाची माहिती देऊन, प्रशिक्षण घेऊनच या व्यवसाया मध्ये उतरावे,बँकेचे घेतलेले



**एसबीआय मुख्य प्रबंधक शेषागिरी यांची उपस्थिती**

अर्थ सहाय्य ज्या कामासाठी घेतले त्याच कामावर खर्च करून नियमितपणे परत फेड करावी. डॉ.शेजुळ यांनी पशुपालन करत असताना येणार्या अडचणीवर मात कशी करावीव अनेक पशुधन योजना,घ्यावयाची काळजी व व्यवस्थापण सांगितले.डॉ. आवळे यांनी पशुधन यांना लागणारे दैनंदिन आहार नियोजन कसे केले जावे याची थोडक्यात माहिती दिली.श्री बोचकुरे यांनी सविस्तर पशुधन पालन प्रशिक्षण विषयी सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच कृषी अधिकारीपवार यांनी कृषी विभागा मार्फत असलेल्या उपयुक्त योजनेची माहिती व सांगितली. सूत्रसंचालन जय महेश साखर कारखान्याचे पशुधन अधिकारी डॉ.विठ्ठल वाघ यांनी केले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अतुल आदमाने,प्रदीप सोळंके,अमोल सोळंके यांनी परिश्रम घेतले.

## हिंदू न्यायासाठी मंठ्यात मोर्चासह बंद

**मंठा । प्रतिनिधी**

मागील काही महिन्यांपासून बांगलादेशात प्रचंड मोठा हिंसाचार उफाळला असून बांगलादेशी हिंदूवर झालेल्या हल्ल्याच्या बातम्या प्रसिद्ध झाल्या नाहीत.असा दिवस जात नाही. बांगलादेशात १ कोटी ३१ लाख हिंदूच्या जीवाला आज धोका आहे. त्या ठिकाणी कधी मंदिरे पाडली जात आहेत, तर कधी पुतळे तोडले जातात, हिंदू प्रतीकांची विटंबना केली जात आहे, या सर्व अन्यायाविरोधात आवाज उठवणारा किंवा निषेध करणाऱ्या हिंदूच्या हत्या केल्या जातात. अनेक व्हिडिओ असे आहेत जे आपल्यासारख्या सहिष्णू हिंदू बांधवांना बघता येणे अशक्य आहे. आपण बघितलेल्या प्रत्येक व्हिडिओमध्ये हिंदूवर अत्यंत क्रूरपणे त्रास दिलेला दिसून येत आहे. या ठिकाणी हिंदूवर होणारे हल्ले आणि धमक्यांची तीव्रता वाढत आहे. याची दखल घेत बांगलादेशातील कट्टरवाद्यांना कारवाई करण्याची मागणी हिंदू बांधवांच्या वतीने करण्यात आली.यावेळी नायब तहसीलदार काळदाते यांना निवेदन स्वीकारले.या प्रसंगी शिवसेना जिल्हाप्रमुख तथा बाजार समितीचे सभापती ऐ.जे.बोराडे,परेश बागवे,सतीशराव निर्वळ ,

वैजनाथ बोराडे,राजेश मोरे,बालासाहेब बोराडे,प्रदीप बोराडे,गणेश बोराडे यांच्यासह हिंदू बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



**हिंदूंच्या सन्मानासाठी केंद्र सरकार व मानवाधिकार आयोगाने कठोर भूमिका घ्यावी -हिंदू बांधवांची भावना**

मंठा शहरातील छत्रपती संभाजी महाराज चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौकापर्यंत सकल हिंदू बांधवांच्या वतीने हिंदू न्याय मोर्चा काढण्यात आला. तसेच मंठा शहर कडकडीत बंद ठेवून निषेध व्यक्त करण्यात आला.या मोर्चादरम्यान जय श्रीराम भारत माता की जय अशा घोषणा देण्यात आल्या.यावेळी पोलीस निरीक्षक रवींद्र निकाळजे यांच्या पथकाकडून चूक बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## सर्व भारतीयांनी बंधुता संकल्पना मनात रुजवावी - वर्षा मुकीम

**जालना । प्रतिनिधी**

१० डिसेंबर हा दिवस मानवी हक्क दिन म्हणून सर्वत्र साजरा करण्यात येत असतो. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेत स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय हे तत्व नमुद केले आहेत. या चार तत्वांचे पालन म्हणजेच मानवी अधिकार होय. नागरिकांनी आपल्यासह दुसऱ्यांच्या स्वातंत्र्याचा प्रथमत: विचार करणे गरजेचे असून सर्व भारतीयांनी बंधुता संकल्पना मनात रुजवावी, असे प्रतिपादन सरकारी अभियोक्ता वर्षा मुकीम यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल भवनात मंगळवार दि.१० डिसेंबर २०२४ रोजी दुपारी ४ वाजता मानवी हक्क दिनाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार, निवासी उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे ॲड. महेश धन्नावत, तहसीलदार




प्रणाली तायडे यांची प्रमुख उपस्थिती होती. सरकारी अभियोक्ता श्रीमती मुकीम म्हणाल्या की, १९४८ मध्ये संयुक्त राष्ट्र संघाने ३० मानव अधिकाराचे घोषणापत्र स्विकारले. तर १९९३ पासून भारतात मानव अधिकार कायदा लागू करण्यात आला. आणि राष्ट्रीय मानवाधिकार आयोग स्थापन झाला. भारतीय संविधानाने दिलेले हक्क हिरावल्यास ते मिळवून देण्याचे काम मानवाधिकार आयोग करतो. जीवनात मानवाला उत्कर्ष साधायचा असेल तर सर्वांना माणसाप्रमाणे जगू देणे महत्वाचे आहे. प्रत्येक मानवाला नेहमी आपल्या कर्तव्याची जाण हवी. मानवाची उत्क्रांती सांगुन समाजात जीवन जगत असतांना झालेल्या स्थितीबदलाचा आलेखही त्यांनी यावेळी मांडला. निवासी उपजिल्हाधिकारी श्री.महाडिक म्हणाले की, भारतामध्ये जन्मताच जे हक्क प्राप्त होतात ते मुलभूत हक्क भारतीय संविधानात सर्वांना समान देण्यात आले आहेत. भारतीय संविधानाने बहाल केलेले अधिकार हे जबाबदारीशिवाय पुर्ण होत नाहीत याची जाणीव ठेवणे महत्वाचे आहे. भारतीय संविधानाने सर्व नागरिकांना सुखी व आनंदाने जीवन जगण्याचा अधिकार दिलेला आहे. आपले कर्तव्य सचोटीने पार पाडले तर मानवी हक्क अबाधित राहतील. भारतातील सर्व नागरिकांना भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधानात समान हक्क दिलेले आहेत.

पान ६ वरून...

### सकल हिंदु समाजाच्या निषेध

अधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात हिंदू समाजावर होणारे हल्ले त्वरित थांबवण्याची मागणी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे करण्यात आली आहे.या प्रसंगी ॲडव्होकेट तेरकर, ज्येष्ठ वकील विश्वास जोशी,ऑड भानुदास डक, ओंकार खुर्पे, व्यापारी महासंघाचे सुरेंद्र रेदासणी, भाजप तालुकाध्यक्ष अरुण राऊत,शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले, माजी सभापती नितीन नाईकनवरे, बजरंग दल प्रमुख मनोज कोरडे, रुपालीताई कचरे, सौरभ जाधव, अभय कोकड, हनुमान कदम, बाबासाहेब आगे, दत्ता महाजन,पवन मानधने यांच्यासह राष्ट्रीय स्वयंसेवक संघ,विश्व हिंदू परिषद,अखिल भारतीय विद्यार्थी परिषद शिवसेना शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान,भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यासह मोठ्या संख्येने हिंदु व बौद्ध समाज उपस्थीत होता.

### आरोपीना कठोर शासन करावे

बारगळ यांच्यासोबत चर्चा केली असून तातडीने आरोपींचा शोध घ्यावा अशा सूचना केल्या आहेत. केज सारख्या अतिशय सहिष्णू आणि शांत मतदार संघात अशी अमानुष घटना निंदनीय असून या प्रकरणाच्या बारकाईने तपासाबाबत स्वतः पाठपुरावा करणार असल्याचेही आ. मुंदडा यांनी सांगितले.

### मस्साजोग खूण प्रकरणातील

अद्याप आरोपी समोर आलेले नाहीत. ही बाब अतिशय गंभीर व निंदनीय असुन महाराष्ट्राच्या संस्कृतीला काळीमा फासणारी आहे. २४ तास उलटुन देखील आरोपी सापडत नाहीत यामुळे नातेवाईकानी मृताचे प्रेत ताब्यात घेण्यास नकार देत या घटनेच्या निषेधार्थ मसाजोगसह केज तालुक्यातील जनता रस्त्यावर उतरलेली आहे. जिल्ह्यात कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत असताना महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांनी बघ्याची भुमिका नघेता याप्रकरणाकडे तत्काळ लक्ष घालुन आरोपींना अटक करण्याची मागणी शिवक्रांती संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तथा काँग्रेसचे तालुकाध्यक्ष गणेश बजगुडे पाटील यांनी केली आहे.

### बांगलादेशातील इस्लामी

या धार्मिक अत्याचारांमुळे हिंदूंचे धार्मिक स्वातंत्र्य धोक्यात आले आहे तसेच विविध धर्म यांचे सहजीवन धोक्यात आल्याचे दिसून येत आहे

मात्र बांगलादेशातील शासन त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहे त्यामुळे बांगला देशातील हिंदू समाजाच्या धार्मिक स्थळांचे संरक्षण करण्यात यावे याबाबत भारत सरकारने कठोर पावली उचलावीत,

इस्कॉन स्वामी चिन्मय कृष्ण महाराज आणि त्यांचे सहकारी यांची अटक बेकायदा असून त्यांची तात्काळ सुटका करण्यात यावी, बांगला देशामध्ये नुकत्याच झालेल्या सत्तांतरा वेळी आणि त्यानंतर विविध समाज माध्यमांमधून हिंदू मुली आणि महिलांवर झालेले अत्याचार आणि मानव अधिकाराचे हनन झाले असल्याचे समोर आलेले आहे त्याबाबत भारत सरकारने जागतिक स्तरावर जाहीर मतप्रदर्शन करावे आणि बांगलादेशातील अल्पसंख्या असलेल्या हिंदू, बौद्ध, जैन आणि शीख समाजातील जनतेचे मानवाधिकाराचे जतन करण्यात यावे यासाठी सकल हिंदू समाजाच्या वतीने उभा करण्यात आलेला हा आलेला हा लढा शक्तीमध्ये रूपांतरित करण्यात यावा असे आवाहनही त्यांनी यावेळी केले यावेळी रोहित दुशी, लालासाहेब कुमकर आणि स्नेहल भोसले यांची समायोजित भाषणे झाली त्यानंतर नायब तहसीलदार श्रीमती अश्विनी पडोळे यांनी सकल हिंदू समाजाच्या वतीने दिलेले निवेदन स्वीकारून आपल्या भावना महाराष्ट्र आणि केंद्र शासनापर्यंत कळवण्यात येतील असे आश्वासन दिले.

## कोविड काळात सर्वसामान्य जनतेची सेवा करुन जिवदान देणाऱ्या आ.सुरेश धस यांना पक्षश्रेष्ठींनी कॅबिनेट मंत्री करावे -सतिश जगदाळे

म्हसोबावाडी (प्रतिनिधी)

राज्यात विधानसभा निवडणुकीत भाजप महायुती सरकारने ऐतिहासिक विजय मिळवला आहे.आष्टी विधानसभा मतदारसंघात देखील भाजप महायुतीचे उमेदवार आ.सुरेश आण्णा धस यांनी न भूतो न भविष्यती असा बहुमताने ७८ हजाराचे लिड घेऊन ऐतिहासिक विजय मिळवला आहे.त्यांना राजकारणाचा दांडगा अनुभव असून ३ वेळा विधानसभा सदस्य तर १ टर्म विधानपरिषद आमदार असताना धडाकेबाज कामगिरी केली आहे.नागरीकांसाठी केसेस अंगावर घेणारे एकमेव आमदार सुरेश धस हे आहेत.गोरगरीब कष्टकरी सर्वसामान्यांच्या प्रश्नांची जाण असून अठरापगड जातीतील लोकांना सोबत घेऊन लोकांच्या सुख दुखात अहोरात्र धावून जात असतात येवढेच नव्हे तर..कोवीड काळात कोवीड सेंटर उभारुन त्यावर स्वतः २४तास लक्ष देऊन सर्वसामान्य जनतेस जिवदान दिले म्हणून लोकांनी त्यांना कौल दिला आहे मतदार संघाला त्यांच्या पदाचा फायदा होतोच तसेच त्यांना कॅबिनेट मंत्री पद दिल्यास यांचा राज्यातील नागरीकांना फायदा होईल सर्वसामान्य जनतेला न्याय मिळण्यासाठी आ.धस यांना नव्याने होणाऱ्या मंत्रिमंडळात कॅबिनेट मंत्रीपद देऊन पक्षश्रेष्ठींने न्याय द्यावा अशी मागणी आण्णा एकनिष्ठ युवा कार्यकर्ते उदंरखेल गावचे रहिवासी किशोर वामन यांनी केली आहे.



आष्टी,पाटोदा,शिरूर मतदारसंघात आ. सुरेश धस हे आष्टी विधानसभेच्या निवडणुकीत भूतो ना भविष्य असे विक्रमी मताधिक्याने निवडून आले असून जनसेवेत असलेले सर्वसामान्यांच्या अडीअडचणीच्या काळात सदैव तत्पर राहून त्यांच्या अडीअडचणी सोडविणारे नेतृत्व म्हणून त्यांची एक वेगळी ओळख आहे. मतदारसंघाच्या गावागावांमध्ये रस्ते, वीज, पाणी देवस्थानचा विकास भक्तनिवास, तरुणांना रोजगाराची संधी, मतदार संघाच्या सर्वांगीण विकासासाठी विकासभिमुख नेतृत्व म्हणून अण्णांची ओळख असून ते लाडके नेतृत्व असून अठरापगड जातींना सोबत घेऊन चालणारा हा नेता आहे कोणत्याही परिस्थितीत न डगमगता कायम धाडसी निर्णय घेत आहेत अनेक जिव्हाळ्याचे प्रश्न त्यांनी मार्गी लावलेले आहेत. वेळोवेळी पोटतिडकीने त्यांनी सभागृहात मतदार संघाचे प्रश्न मांडले आहेत.कोरोनाच्या महामारीत देखील महाराष्ट्रात सर्वात अधिकचे कोविड सेंटर त्यांनी उभारून नागरिकांचे प्राण वाचवले आहेत. महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्रीपद देखील भुषविले आहे. त्यांच्या अनुभवाचा योग्य तो सन्मान करून त्यांना कॅबिनेट मंत्री पद द्यावे त्यांच्या अनुभवाचा आष्टी विधानसभा मतदारसंघासह संपूर्ण महाराष्ट्राला फायदा होईल गोरगरीब कष्टकरी यांच्या न्यायासाठी त्यांना कॅबिनेट मंत्री होणे गरजेचे असल्याचे नव्याने होत असलेल्या मंत्रिमंडळात आ.सुरेश आण्णा धस यांना संधी देऊन पक्षश्रेष्ठींनी न्याय द्यावा अशी मागणी युवा कार्यकर्ते किशोर वामन यांनी केली आहे.

cmyk

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेचे आर्थिक निकष वाढवले

## अधिकाधिक शेतकऱ्यांना मिळणार लाभ

पुणे : अनुसूचित जाती व नवबौद्ध शेतकऱ्यांसाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेचे आर्थिक निकष वाढवून अधिकाधिक शेतकऱ्यांना लाभ देण्याचा निर्णय सरकारने यार्पर्वीच घेतलेला आहे. या योजनेचा जास्तीत-जास्त शेतकऱ्यांनी लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. नवीन सिंचन विहीरीसाठी चार लाख रुपये अनुदान मर्यादा आहे. जुनी विहीर दुरूस्तीसाठी एक लाख रुपये अनुदान मर्यादा आहे. शेततळ्याचे प्लॅस्टिक अस्तरीकरणासाठी अनुदान मर्यादा प्रचलित आर्थिक मापदंड व शेततळ्याचे आकारमानानुसार परिगणित होणाऱ्या रकमेच्या किंवा प्रत्यक्ष खर्चाच्या ९०% किंवा रू.२ लाख यापैकी जे कमी असेल ते. इनवेल बोअरिंगसाठी चाळीस हजार रुपये अनुदान मर्यादा आहे. वीज जोडणी आकार २०,००० किंवा प्रत्यक्ष भरलेला आकार यापैकी जे कमी असेल ते. विद्युत पंपसंच/डिझेल इंजिन (नवीन बाब) साठी १० अश्वशक्ती क्षमतेपर्यंत पंपसंचाकरिता प्रचलित आर्थिक मापदंडाच्या किंवा प्रत्यक्ष होणाऱ्या खर्चाच्या ९०% किंवा रू. ४०,००० यापैकी जे कमी असेल ते. सोलार पंप (वीज जोडणी आकार व पंपसंच ऐवजी)




प्रचलित आर्थिक मापदंडाच्या किंवा प्रत्यक्ष होणाऱ्या खर्चाच्या ९०% किंवा रू. ५०,००० यापैकी जे कमी असेल ते. एचडीपीई/ पीव्हीसी पाईप (नवीन बाब) प्रचलित आर्थिक मापदंडाच्या किंवा प्रत्यक्ष होणाऱ्या खर्चाच्या १००% किंवा रू. ५०,००० यापैकी जे कमी असेल ते.सुक्ष्म सिंचन संच मध्ये तुषार सिंचन संचासाठी प्रचलित आर्थिक मापदंडाच्या किंवा प्रत्यक्ष खर्चाच्या ९०% किंवा रू.४७,०००/- अनुदान यापैकी जे कमी असेल ती अनुदान मर्यादा आहे. ठिबक सिंचन संचासाठी प्रचलित आर्थिक मापदंडाच्या किंवा प्रत्यक्ष खर्चाच्या ९०% किंवा रू.९७,०००/- अनुदान यापैकी जे कमी असेल ते. तुषार सिंचन संच पुरक अनुदान प्रति थेंब अधिक पीक योजनेंतर्गत (१) अल्प /अत्यल्प भूधारकांसाठी ५५% + मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजनेतून २५% + डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजनेतून १०% तसेच (२) बहू भूधारकांसाठी ४५% + मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजनेतून ३०% + डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेतून १५% किंवा रू. ४७,०००/- यापैकी जे कमी असेल ते (एकूण ९०% अनुदान मर्यादेत).ठिबक सिंचन संच पुरक अनुदान प्रति थेंब अधिक पीक योजनेंतर्गत (१) अल्प /अत्यल्प भूधारकांसाठी ५५% + मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजनेतून २५% + डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजनेतून १०% तसेच (२) बहू भूधारकांसाठी ४५% + मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजनेतून ३०% + डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजनेतून १५% किंवा रू. ९७,०००/ - यापैकी जे कमी असेल ते (एकूण ९०% अनुदान मर्यादेत). यंत्रसामुग्री (बैलचलित/ ट्रॅक्टर चलित अवजारे)(नवीन बाब) ५०,००० रुपये आणि परसबाग (नवीन बाब) ५,००० रुपये असे आहे.

# रांगडा कांद्याच्या लागवडीची उपयुक्त माहिती



महाराष्ट्रात अनेक भागात रांगडा कांद्याची लागवड होते कारण या हंगामात लागवड केलेल्या कांद्याची साठवणक्षमता खरिप हंगामापेक्षा उत्कृष्ट असते. रांगड्या कांद्याच्या लागवडीसाठी ऑगस्ट, सप्टेंबर मध्ये रोपवाटिका तयार केली जाते आणि रब्बी हंगामात रोपांची पुनर्लागवड केली जाते. जाणून घेऊ या रांगडा कांद्याचे करावयाचे व्यवस्थापन.

रांगडा कांद्याचे व्यवस्थापन :

एक एकर कांदा लागवडीसाठी दोन गुंठे क्षेत्रावर रोपवाटिका तयार करावी. एक एकर लागवडीसाठी दोन ते तीन किलो बियाणे पुरेसे आहे. पेरणीपूर्वी बीज प्रक्रिया करण्यासाठी प्रति किलो बियाण्यास २ ग्रॅम कार्बेन्डाझिम हे बुरशीनाशक चोळावे. पेरणीपूर्वी २०० किलो शेणखतासोबत ५०० ग्रॅम ट्रायकोडर्मा व्हिरीडी वापरून जमिनीत मिसळावे. रोपवाटिकेत ठिबक किंवा स्प्रिंकलर सिंचन पद्धतीचा वापर करण्यासाठी जमिनीपासून १० ते १५ सें.मी. उंच, १ ते १.२ मीटर रूंद आणि गरजेनुसार लांब गादीवाफे जमिनीच्या उताराला आडवे तयार करावेत. यामुळे रोपांची वाढ एकसारखी होते आणि पाणी फार काळ साचून राहत नाही, रोपे कुजत किंवा सडत नाहीत, लावणीच्या वेळी सहज उपटून काढता येतात, रोपांच्या गाठी जाड व लवकर तयार होतात. वाफे तयार करताना दर १६०० ग्रॅम नत्र, ४०० ग्रॅम स्फुरद, ४०० ग्रॅम पोटॅश प्रति २०० चौरस मीटर याप्रमाणे खते द्यावीत.


रुंदीशी समांतर ५-७.५ सें.मी. अंतरावर एक रेघा पाडून १-१.५ से.मी. खोलीवर बियाणे पेरावे. पेरणीनंतर चांगले कुजलेले शेणखत किंवा कंपोस्ट खताने बियाणे झाकून ठेवावे, नंतर झारीने जेमतेम वाफ्यावर फिरेल अशा पद्धतीने पाणी द्यावे. पेरणीनंतर २० दिवसांनी हाताने खुरपणी करून ८०० ग्रॅम प्रति २०० चौरस मीटर या प्रमाणात नत्र द्यावे.

# पावसानूसार करसं असावं पिकांचे नियोजन?

बंगालच्या उपसागरात कमी दाब क्षेत्राची निर्मिती होताच राज्याच्या अनेक भागांत पावसाला सुरुवात झाली आहे. त्यामुळे ज्याठिकाणी पेरणीयोग्य पाऊस झाला आहे अशा ठिकाणी उपलब्ध ओलीवर अनेक शेतकऱ्यांनी खरीपातील मुख्य पिकाची पेरणी केली आहे.

पेरणी झालेल्या पिकामध्ये कोणती व्यवस्थापनाची कामे करावीत याविषयी वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या ग्रामीण कृषी मौसम सेवा योजनेतील तज्ज्ञ समितीने दिलेल्या शिफारशीची माहिती आपण घेणार आहोत.

पाऊस झालेल्या ठिकाणी उगवून आलेल्या सोयाबीन आणि ज्वारी पिकात विरळणी व नांग्या भरुन घ्याव्यात. जुलैच्या पहिल्या आठवडयानंतर ज्वारीची पेरणी करु नये. ज्वारीची उशिरा पेरणी केल्यास खोडमाशीचा प्रादुर्भाव होऊन ताटाची संख्या घटते. पेरणी न केलेल्या भागात पेरणीयोग्य पाऊस झाल्यानंतर म्हणजेच ७५ ते १०० मिलीमीटर पाऊस झाल्यानंतरच बिजप्रक्रिया करून बाजरी ची पेरणी करावी. बाजरी पिकाची पेरणी २० जुलैपर्यंत करता येते. सुरू ऊसाची पक्की बांधणी केली नसल्यास ती करून घ्यावी व नत्राचा चौथा हप्ता द्यावा. हळदीमध्ये आंतरपीके घेताना पहिल्या तीन ते साडेतीन महिन्यापर्यंत काढणी होईल अशा प्रकारची आंतरपीके निवडावीत. यामध्ये पालेभाज्या सारख्या आंतरपिकांचा समावेश असावा. पाऊस झालेल्या ठिकाणी नविन संत्रा, मोसंबी, डाळिंब, चिकू बागेची लागवड करावी. नवीन लागवडीसाठी फळपिकांच्या शासकीय नोंदणीकृत रोपवाटीकेतूनच रोपांची खरेदी करावी. लिंबुवर्गीय पिकांत कोळी किडींचा प्रादुर्भाव दिसून आल्यास या किडीच्या नियंत्रणासाठी ५ टक्के निंबोळी अर्क किंवा ॲझाडिरेक्टीन १० हजार पीपीएम ३ ते ५ मिली प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. मृग बहाराच्या संत्रा, मोसंबी बागेत अन्नद्रव्यांची कमतरता



दिसून येत असल्यास चिलेटेड झिंक ५० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. पाऊस झालेल्या ठिकाणी जमिनीत ओलावा बघून भेंडी, कारले, भोपळा, दोडका या बियाद्वारे लागवड केल्या जाणाऱ्या भाजीपाला पिकांची लागवड करावी. गादीवाफ्यावर तयार केलेल्या भाजीपाला पिकांच्या रोपांना ४५ दिवस झाले असल्यास पाऊस झालेल्या ठिकाणी जमिनीत ओलावा बघून वांगी, मिरची, टोमॅटो या भाजीपाला पिकांची पूनर्लागवड करावी. काढणीस तयार असलेल्या भाजीपाला पिकाची काढणी करून घ्यावी. शंखी गोगलगायीच्या व्यवस्थापनासाठी पाऊस पडल्यानंतर सर्व शेतकऱ्यांनी सामूहिक मोहिम राबवून गोगलगायी गोळा करून प्लास्टीकच्या पोत्यात भरून त्यात कोरडे मिठ अथवा चूना टाकून नष्ट कराव्यात. पेरणी न केलेल्या भागात पेरणीयोग्य पाऊस झाल्यानंतर बिजप्रक्रिया करूनच मका या चारा पिकाची पेरणी करावी. मका या चारापिकासाठी ८० किलो नत्र ४० किलो स्फुरद आणि ४० किलो पालाश प्रति हेक्टरी खत मात्रा पेरणीच्यावेळी द्यावी. रेशीम उत्पादक किंवा रेशीम उद्योजकाकडे गाय, म्हैस, शेळी व मेंढी हे पशुधन असणे आवश्यक आहे. तुती रेशीम किटकांसाठी उत्तम खाद्य असून तुती पानांत ते ३६ टक्क्यांपर्यंत प्रथीनांचं प्रमाण असतं त्यामुळे भाकड किंवा दुधाळ पशुधन असले तरी त्यास उत्तम खाद्य म्हणून तुती पानांचा वापर करता येतो. त्यामूळे ३४ टक्के जास्त दुधात वाढ होते. फॅट टक्केवारी ४ % जास्त मिळते व दुधाला चांगला भाव मिळतो. त्याचबरोबर सिल्क आणि मिल्क उत्पादन करायची संधी उपलब्ध होते. अशा प्रकारे खरीप पिकांचे पावसानूसार नियोजन केल्यास उत्पादनवाढ साध्य होते.

# कोंबड्यांमधील विषाणूजन्य आजारावर उपाययोजना

कोंबड्यांमध्ये एव्हियन इन्फ्लुएंझा, फाऊल पॉक्स, न्यूकॅसल डिसीज, इन्फेक्शियस ब्रॉन्कायटिस, संसर्गजन्य लॅरिन्गोट्राकायटिस, लिम्फॉइड ल्युकोसिस, इन्फेक्शियस बर्सल डिजीज आणि एव्हियन एन्सेफॅलोमायलिटिस यासारखे अनेक संसर्गजन्य विषाणूजन्य आजार आहेत. त्यापैकी सर्वात महत्त्वाचा विषाणूजन्य आजार म्हणजे एव्हियन इन्फ्लूएंझा, फॉउल पॉक्स, न्यूकॅसल रोग, इन्फेक्शियस ब्रॉन्कायटिस आणि इन्फेक्शियस बर्सल डिसीज. यामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान होऊ शकते.

फाऊल पॉक्स :फाऊल पॉक्स हा कोंबड्या, बदके, टर्की, आणि इतर पक्ष्यांमध्ये होणारा विषाणूजन्य आजार आहे. हा आजार जगभरात आढळतो. प्रामुख्याने त्वचेला तसेच श्वसनमार्गांना बाधित करतो. फाऊल पॉक्स आजारामुळे उत्पादनक्षमतेवर परिणाम होतो आणि गंभीर प्रकरणांमध्ये मृत्यूही होऊ शकतो.

उपाययोजना - फाऊल पॉक्स लसीकरण करावे. पिल्लांना ६ ते ८ आठवड्यांच्या वयात लस द्यावी. डासांचा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी स्वच्छता ठेवणे. शेड नियमितपणे स्वच्छ ठेवणे.दूषित उपकरणे निर्जंतुक करावीत. बाधित पक्ष्यांना निरोगी पक्ष्यांपासून दूर ठेवावे.

न्यूकॅसल आजार : न्यूकॅसल रोगाची तीव्रता विषाणूच्या स्ट्रेननुसार बदलते. व्हेलोजेनिक : सर्वाधिक घातक, उच्च मृत्यूदर.श्वसन आणि मज्जासंस्थेवर परिणाम.



मेसोजेनिक : मध्यम तीव्रतेचा, अंडी उत्पादनात घट. लेंटोजेनिक : सौम्य प्रकार, कमी तीव्रता, लसीकरणासाठी वापरला जातो.

उपाययोजना - आजार टाळण्यासाठी लसीकरण अत्यंत महत्त्वाचे आहे. पिल्लांना पहिली लस १-७ दिवसांच्या वयात आणि दुसरी लस ४ ते ६ आठवड्यांनंतर द्यावी. शेड स्वच्छ आणि निर्जंतुक ठेवावी. बाहेरचे पक्षी किंवा व्यक्तींना शेडमध्ये प्रवेश बंद करावा. इन्फेक्शियस ब्रॉन्कायटिस : इन्फेक्शियस ब्रॉन्कायटिस हा कोंबड्यांमध्ये होणारा अत्यंत संसर्गजन्य आजार आहे. हा आजार श्वसनसंस्थेवर, पचनसंस्थेवर आणि प्रजननसंस्थेवर देखील परिणाम करतो.उपाययोजना - वेळेवर लसीकरण करावे. पिल्लांना पहिली लस १ ते २ आठवड्यांच्या वयात द्यावी. पुनर्लसीकरण ६ ते ८ आठवड्यांनी किंवा फार्मच्या वेळापत्रकानुसार करावे.इन्फेक्शियस बर्सल डिजीज : या आजाराला गंबोरो देखील म्हणतात. अत्यंत संसर्गजन्य विषाणूजन्य आजार आहे. हा आजार रोगप्रतिकारक शक्तीवर परिणाम करून त्यांच्या आरोग्यास मोठ्या प्रमाणावर हानी पोहोचवतो.

उपाययोजना - वेळेवर लसीकरण करणे गरजेचे आहे. पहिली लस २ ते ३ आठवड्यांच्या वयात द्यावी.शेडमध्ये आजाराचा धोका असल्यास पुनर्लसीकरण करावे. कोंबड्यांच्या विविध विषाणूजन्य रोगांचे प्रतिबंध आणि नियंत्रण हे उपचारापेक्षा अत्यंत महत्त्वाचे आहे. योग्य जैवसुरक्षा आणि चांगल्या व्यवस्थापन पद्धतींमुळे पोल्ट्री फार्ममधील आजाराचा प्रादुर्भाव कमी होतो जेणेकरून कोंबड्यांच्या विविध विषाणूजन्य आजारावर नियंत्रण ठेवण्यासाठी जैवसुरक्षा, चांगल्या व्यवस्थापन पद्धती आणि योग्य व प्रौढ अवस्थेत लसीकरणाचे वेळापत्रक पाळले पाहिजे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६८७ : ईस्ट इंडिया कंपनी ने मद्रास मध्ये सर्वात आधी महानगरपालिका बनवली होती.
१८१६ : इंडियाना हे अमेरिकेचे १९ वे राज्य बनले.
१८४५ : पहिले आंग्ल-सिख युद्ध झाले होते.
१८५८ : बंकिमचंद्र चट्टोपाध्याय आणि यदुनाथ बोस हे कलकत्ता विश्वविद्यालयामधून पहिले पदवीधर बनले.
१९३० : सी. व्ही. रमण यांना नोबेल पारितोषिक
१९३७ : इटली ने मित्र राष्ट्र संघ ला सोडले.
१९४१ : दुसरे महायुद्ध - जर्मनी व इटली यांनी अमेरिकेविरुद्ध युद्ध पुकारले.
१९४६ : डॉ. राजेंद्र प्रसाद हे संविधान सभेचे निर्वाचित अध्यक्ष बनले होते.
१९४६ : युनिसेफ ची स्थापना
१९४६ : स्पेन या देशाला संयुक्त राष्ट्र संघाने निलंबित केले.
१९६० : लहान मुलांच्या विकासकामाला लागलेली संस्था युनिसेफ च्या सन्मानासाठी १५ नवीन टपाल तिकिटांची निर्मिती सुरु केली होती.
१९६४ : संयुक्त राष्ट्र संघाची संस्था युनिसेफ ची स्थापना.
१९६७ : कोयना येथे ६.५ रिश्टर तीव्रतेचा भूकंप होऊन १८० जण ठार आणि १५०० लोक जखमी झाले व मोठया प्रमाणात वित्तहानी झाली.
१९७२ : अपोलो मोहिमेतील अपोलो १७ हे सहावे चांद्रयान चंद्रावर उतरले.
१९९४ : अध्यक्ष बोरिस येल्त्सिन यांच्या आदेशावरुन रशियन फौजांनी चेचेन्यामधे प्रवेश केला.
२००१ : चीनचा वर्ल्ड ट्रेड ऑर्गनायझेशन मधे प्रवेश
२००३ : मेरिदा येथे ७३ देशांनी भ्रष्टाचार विरोधी करारावर सह्या केल्या.
२००७ : उत्तर कोरिया आणि दक्षिण कोरिया यांच्या मध्ये ५० वर्षानंतर पुन्हा रेल्वे सेवा पुर्वव्रत.
२०१४ : भारताचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदीयांनी सुरुवात केलेल्या योग दिवसाला संयुक्त राष्ट्र संघटनेने स्वीकृती दिली होती.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८१० : फ्रांस चे प्रसिद्ध कवी अल्फ्रेड डोमोसे यांचा जन्म.
१८४३ : रॉबर्ट कोच - क्षयरोगावरील मूलभूत संशोधनासाठी १९०५ मध्ये नोबेल पारितोषिक मिळालेले जर्मन डॉक्टर (मृत्यू: २७ मे १९१०)
१८६७ : 'उपन्यास सम्राट' रजनीकांत बर्दोलोई आसामी कादंबरीकार, आसामी ऐतिहासिक कादंबरीचे जनक (मृत्यू: २५ मार्च १९४०)
१८८२ : सुब्रम्हण्यम भारती - तामिळ साहित्यिक (मृत्यू: ११ सप्टेंबर १९२१)
१८९२ : अयोध्या नाथ खोसला - स्थापत्य अभियंते, पाटबंधारे व जलनिस्सारण आयोगाचे अध्यक्ष, पद्मभूषण (१९५४), रुरकी विद्यापीठाचे कुलगुरू (१९५४ १९५९), राज्यसभा खासदार (१९५८ १९५९), योजना आयोगाचे अध्यक्ष (१९५९), राष्ट्रीय विज्ञान अकादमीचे अध्यक्ष (१९६१ १९६२), ओरिसाचे राज्यपाल (१९६२ १९६६), पद्मविभूषण (१९७७)
१८९९ : पु. य. देशपांडे - कादंबरीकार व तत्त्वचिंतक
१९०९ : नारायण गोविंद कालेलकर - साहित्य अकादमी पारितोषिक विजेते (१९६८) भाषाशास्त्रज्ञ.
१९१५ : मधुकर दत्तात्रय तथा बाळासाहेब देवरस - राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे तिसरे सरसंघचालक (मृत्यू: १७ जून १९९६)
१९२२ : मोहम्मद युसुफ खान ऊर्फ दिलीपकुमार - चित्रपट अभिनेता, पद्मभूषण (१९९१), दादासाहेब फाळके पुरस्कार (१९९४), राज्यसभा खासदार, मुंबईचे नगरपाल
१९२५ : राजा मंगळवेढेकर - बालसाहित्यकार (मृत्यू: १ एप्रिल २००६)
१९२९ : सुभाष गुप्ते - लेगस्पिनर (मृत्यू: ३१ मे २००२)
१९३१ : भगवान श्री रजनीश (मृत्यू: १९ जानेवारी १९९०)
१९३५ : भारताचे राष्ट्रपती आणि अर्थतज्ञ प्रणवकुमार मुखर्जी यांचा जन्म.
१९४२ : आनंद शंकर - प्रयोगशील संगीतकार (मृत्यू: २६ मार्च १९९९)
१९६९ : विश्वनाथन आनंद - भारतीय ग्रँडमास्टर व विश्वविजेता
१९८२ : ला तमिळ चे प्रसिद्ध लेखक सुब्रह्मण्य भारती यांचा जन्म.
२००६ : अंतराळवीर सुनिता विल्यम आय. एस. एस. (आंतरराष्ट्रीय स्पेस स्टेशन) वर पोहोचली.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७८३ : रघुनाथराव पेशवा (जन्म: १८ ऑगस्ट १७३४)
१९३९ : उत्तर प्रदेश चे प्रसिद्ध वकील आणि सार्वजनिक कार्यकर्ते जगत नारायण मुल्ला यांचे निधन.
१९४९ : प्रसिद्ध विचारक आणि लेखक कृष्णचंद्र भट्टाचार्य यांचा जन्म.
१९८७ : गुरूनाथ आबाजी तथा जी. ए. कुलकर्णी साहित्य अकादमी पुरस्कार विजेते गूढकथालेखक (जन्म: १० जुलै १९२३)
१९९८ : रामचंद्र नारायण द्विवेदी ऊर्फ कवी प्रदीप 'ए मेरे वतन के लोगो' या गाण्यामुळे प्रत्येक भारतीयाच्या काळजाला भिडणार्या रचनेमुळे आपले वेगळेपण ठसविणारे आधुनिक राष्ट्रकवी (जन्म: ६ फेब्रुवारी १९१५)
२००१ : झांबिया देशाचे पहिले पंतप्रधान मेन्झा चोना यांचे निधन. (जन्म: २१ जानेवारी १९३०)
२००१ : रामचंद्र नारायण दांडेकर - भाषातज्ज्ञ आणि वैदिक संस्कृतीचे अभ्यासक (जन्म: १७ मार्च १९०९)
२००२ : नानाभॉय अर्देशीर ऊर्फ 'नानी' पालखीवाला - कायदेपंडित आणि अर्थतज्ज्ञ (जन्म: १६ जानेवारी १९२०)
२००४ : एम. एस. सुब्बुलक्ष्मी - विख्यात शास्त्रीय गायिका (जन्म: १६ सप्टेंबर १९१६)
२०१३ : भारतीय तत्त्ववेत्ता आणि विद्वान शेख मुसा शरीफी यांचे निधन.
२०१५ : भारतीय चित्रकार आणि मूर्तिकार हेमा उपाध्याय यांचे निधन.

# पवनचक्की कंपन्यांकडून फसवणूक शेतकरी आत्महत्यांचे कारण ठरणार

## पवनचक्की कंपन्यांची पाठराखण करणाऱ्या लोकप्रतिनिधींना शेतकरी माफ करणार नाहीत

बीड। प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील पवनचक्की कंपन्यांकडून शेतकऱ्यांची आर्थिक फसवणूक होत असुन शेतकऱ्यांच्या अडाणी पणाचा फायदा घेत स्थानिक दलाल आणि बाहेर गावचे गुंड गोरगरीब शेतकऱ्यांना धमकावत शेतकऱ्यांना मावेजा अथवा नुकसान भरपाई न देताच पिकांचे नुकसान करत पोलिस प्रशासनाच्या मदतीने दादागिरी करत धमकावत असल्याच्या तक्रारी जिल्हा प्रशासन आणि पोलीस प्रशासन यांना मिळुनही पोलिस प्रशासन पवनचक्की कंपन्यांची आर्थिक हितसंबंध जोपासत बाजु घेत असल्याचा आरोप अनेक तक्रारदारांनी केला आहे. यामुळे बीड जिल्ह्यात भविष्यकाळात नापिकी, कर्जबाजारीपणा याबरोबरच पवनचक्की कंपन्यांकडुन आर्थिक फसवणूक हे सुद्धा शेतकरी आत्महत्येचं प्रमुख कारण पुढे येऊ शकते अशी भिती सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी व्यक्त केली असुन पोलिस प्रशासन आणि जिल्हा प्रशासनाने वेळीच पवनचक्की कंपन्यांच्या मनमानी कारभाराला आवर घालुन शेतकऱ्यांचे रक्षण करावे अशी मागणी डॉ.गणेश ढवळे यांनी मुख्यमंत्री, गृहमंत्री यांना निवेदनाद्वारे केली आहे.

बालाघाटावरील चौसाळा परीसरातील गोलंग्री,कानडीघाट, सुलतानपूर येथील शेतकऱ्यांनी पवनचक्की कंपन्यांच्या मनमानी कारभार विरोधात आवाज उठवला असुन लोकप्रतिनिधींनी शेतकऱ्यांच्या पाठीशी उभं रहाणं आवश्यक आहे. केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची



पवनचक्की कंपन्यांच्या वादातुन दिवसाढवळ्या अपहरण करून झालेली निर्घृण हत्या कायदा व सुव्यवस्था ढासळल्याचे बीडचा बिहार होतोय की काय? अशी शंका उपस्थित करण्यासाठी पुरेशी आहे. बीड तालुक्यातील बालाघाटावरील पवनचक्की कंपन्यांकडून शेतकऱ्यांची आर्थिक लुट प्रकरणात पिडीत शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहण्याची राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते योगेश क्षीरसागर आणि केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्येप्रकरणी पवनचक्कीचे काम करणाऱ्या आवादा कंपनी आणि संबंधित कंत्राटदार यांचा सहभाग असण्याची शक्यता असुन त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात यावेत अशी भूमिका घेणारे शिवसेना (शिंदे गट) जिल्हाप्रमुख सचिन मुळुक आणि स्वप्नील गलधर यांचे कौतुक करावे तेवढे कमीच आहे अशी प्रतिक्रिया डॉ.गणेश ढवळे यांनी दिली.

# विभागीय युवक महोत्सवामध्ये केएसके महाविद्यालयाच्या संघाची निवड



बीड। प्रतिनिधी

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडाधिकारी कार्यालय,परभणी तथा जिल्हा क्रीडा परिषद,परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित होणार्या विभागस्तरीय युवक महोत्सवासाठी सौ. के. एस. के. महाविद्यालयाच्या समूह लोकगीत, काव्यलेखन, कथा लेखन या कला प्रकारांची परभणी येथे होणार्या विभागीय युवक महोत्सवामध्ये निवड झालेली आहे.

यामध्ये अविष्कार क्षीरसागर,सागर गायकवाड, आदित्य दुन्गु, अमर मोरे, कैवल्य सुरवसे,विशाल अंकुशे,राजेंद्र तिपाले, विजय कोरडे, सुरज राधाकिशन उफाडे या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यासाठी संगीत विभाग प्रमुख डॉ.सुरेखा जोशी, डॉ.दीपक जमधाडे यांचे मार्गदर्शन मिळाले. तसेच साथसंगत प्रा.सुरेश थोरात, प्रा.इंद्रजीत भांगे, प्रा. पवन शिंदे,नितीन प्रधान यांनी केली.या यशाबद्दल संस्थेचे सचिव मा.डॉ.भारतभूषण क्षीरसागर, संस्थेच्या उपाध्यक्ष डॉ.दीपा क्षीरसागर, डॉ.योगेश भैय्या क्षीरसागर तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.व्ही.क्षीरसागर, पदव्युत्तर पदवी विभागाचे संचालक डॉ.खान ए.एस., डॉ.सुधाकर गुट्टे, कार्यालयीन अधिक्षक डॉ.विश्वांभर देशमाने आणि महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी,विद्यार्थी यांनी त्यांचे अभिनंदन केले.

# संतोष देशमुख खून प्रकरणात पवनचक्की कंपनी व कॉन्ट्रॅक्टरवर खुनाचा गुन्हा दाखल करा-सचिन मुळूक

बीड। प्रतिनिधी

केज तालुक्यातील मस्साजोगचे माजी सरपंच संतोष देशमुख यांचे आज अपहरण करुन त्यांचा खुन केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणामागे पवनचक्की उभारणाऱ्या कंपनीच्या अधिकाऱ्यांचा व कॉन्ट्रॅक्टरचा हात असण्याची शक्यता आहे. या प्रकरणाचा पोलिसांनी सखोल तपास करुन पवनचक्की कंपनी व कॉन्ट्रॅक्टर वर खुनाचा गुन्हा दाखल करावा अशी मागणी शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, स्वप्नील गलधर यांनी केला आहे.

जिल्ह्यामध्ये पवनचक्की उभारण्याचे काम एका कंपनीकडून सुरू आहे. शेतकऱ्यांच्या शेतामध्ये पवनचक्की उभारल्या जात आहेत. यासाठी संबंधीत कंपनीकडून शेतकऱ्यांना नियमानुसार जमिनीचा मावेजा देणे बंधनकारक आहे. मात्र बीड जिल्ह्यात पवनचक्की कंपनीच्या अधिकाऱ्यांची मनमानी सुरू आहे. जिल्हाभरात पवनचक्की उभारण्याचे काम सुरू असून पवनचक्की कंपनीच्या अधिकाऱ्यांकडून शेतकऱ्यांना जमिनीचा मावेजा दिला जात नाही. शेतकऱ्यांनी मावेजा मागितला तर स्थानिक गुंडांकडून धमकावण्याचे प्रकार घडत आहेत. तसेच शेतकऱ्यांनी मावेजासाठी पवनचक्कीचे काम अडविले तर पवनचक्की उभारणाऱ्या कंपनीचे अधिकारी उलट शेतकऱ्यांनाच जेलमध्ये टाकण्याची धमकी देतात. असल्याचा आरोप मुळूक, गलधर यांनी केला आहे. दरम्यान केज तालुक्यातील मस्सजोगचे माजी सरपंच संतोष देशमुख यांचे दोन



दिवसांपूर्वी पवनचक्की उभारणाऱ्या कंपनीच्या अधिकाऱ्यांसोबत वाद झाल्याची माहिती समोर येत आहे. या प्रकरणी गुन्हाही नोंद झाला आहे. या घटनेला दोन दिवसांचा कालावधी झाल्यानंतर आज डोणगाव परिसरातून संतोष देशमुख यांचे अपहरण करण्यात आले. यानंतर बोरगाव-दैठण रस्त्यावर त्यांचा मृतदेह आढळून आला. या खुनामागे पवनचक्की उभारणाऱ्या कंपन्यांच्या अधिकाऱ्यांचा व कॉन्ट्रॅक्टरचा हात असण्याची शक्यता असून पोलिसांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करून कंपनी व कॉन्ट्रॅक्टर वर कुणाचा गुन्हा दाखल करावा अशी मागणी मुळूक, गलधर यांनी केला आहे.

# सिंदफणा शाळेच्या स्काऊट विद्यार्थ्यांचा राज्यस्तरीय शिबिरात सहभाग

माजलगाव। प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य भारत स्काऊटस्? व गाईडस्? मुंबई च्या वतीने आयोजित राज्यस्तरीय राज्य पुरस्कार स्काऊट चाचणी शिबिर दिनांक २ ते ५ डिसेंबर २०२४ मध्ये राज्य प्रशिक्षण केंद्र छत्रपती संभाजीनगर येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला. सिंदफणा पब्लिक स्कूल, माजलगाव येथील ०२ स्काऊट विद्यार्थ्यांनी या चार दिवसीय शिबिरामध्ये सक्रिय सहभाग नोंदविला. जालना जिल्ह्याचे स्काऊट गाईड विभागाचे जिल्हा संघटक स्काऊट तथा लीडर ट्रेनर स्काऊट के.एल.पवार यांची शिबिर प्रमुख नियुक्ती करण्यात आली होती या अनुषंगाने यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन करण्यात आले.




शिबिरादरम्यान विद्यार्थ्यांची परीक्षा स्काऊट गाईड त्रिवार्षिक अभ्यासक्रमावर आधारित लेखी, तोंडी आणि प्रात्यक्षिक स्वरूपात मोठ्या खेळीमेळीच्या वातावरणात घेण्यात आली. या परीक्षेत राष्ट्रध्वज, राष्ट्रगीत, स्काऊट गाईड इतिहास, प्रार्थना, नियम, वचन, ध्येय, हस्तांदोलन, योगा, प्रथमोपचार, वेगवेगळ्या गाठीचे उपयोग, अंदाजे लांबी,रुंदी, उंची, खोली, होकायंत्र वापर, मागच्या, हाताच्या शिट्टीच्या खुणा,ध्वजारोहण पद्धत, स्वयंपाक, कम्युनिकेशन खेळ,कॅम्प क्राफ्ट,संप्रेषण खेळ, आग विझवण्याच्या पद्धती, पायोनियरिंग प्रकल्प, शिबिर कौशल्य आणि बागकाम या विविध क्षेत्रांचा समावेश होता.


या शिबिरामधून विद्यार्थ्यांना देशप्रेम, शिस्त, स्वावलंबन, आरोग्य संवर्धन, समाजसेवा आणि सहकार्याची भावना या महत्त्वपूर्ण जीवन कौशल्यांचे कार्यात्मक शिक्षण मिळाले.या चाचणी परीक्षेत यशस्वी झालेल्या समर्थ उत्तम राठोड व उसेद युनूस शेख या स्काऊटला महाराष्ट्राचे राज्यपाल महोदय यांच्या स्वाक्षरीचे प्रमाणपत्र मिळणार असून हा त्यांच्या विद्यार्थी जीवनातील एक महत्त्वाचा सन्मान ठरणार आहे.सिंदफणा पब्लिक स्कूल चे अध्यक्ष आमदार प्रकाशदादा सोळंके, उपाध्यक्ष विरेन सोळंके,सचिव मंगलाताई सोळंके, प्राचार्य अन्वर शेख, उपप्राचार्य राहुल कदम, स्काऊट मास्टर पुरुषोत्तम सोळंके, प्रवीणकुमार सोळंके, गाईड मास्टर ललिता सोळंके,वैशाली सोळंके, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी समर्थ राठोड राठोड व उसेद शेख यांचे अभिनंदन केले असून त्यांच्या कठोर परिश्रमाला विशेष श्रेय दिले. या राज्यस्तरीय शिबिरातून विद्यार्थ्यांनी विविधतेतून एकता आणि सकारात्मक जीवनमूल्ये आत्मसात केली आहेत.

# प्रणव शेंडगे यांची भारतीय सैन्य अकादमीत मेजरपदी पदोन्नती

गेवराई । प्रतिनिधी

भारतीय सैन्यदलात २०१८ मध्ये लेफ्टनंटपदी नियुक्ती मिळालेले बीड जिल्हयातील गेवराई तालुक्यातील कोल्हेर येथील सुपूत्र प्रणव सुधाकर शेंडगे यांना ८ दिसेंबर २०२४ रोजी कॅप्टन पदावरून मेजर अशी पदोन्नती प्राप्त झाली . त्यामुळे बीड जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे .

गेवराई तालुक्यातील कोल्हेर येथील रहिवासी आणि छत्रपती संभाजीनगर येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात हिन्दी विभागाचे प्रोफेसर असलेले डॉ . सुधाकर शेंडगे यांचे थोरले चिरंजीव प्रणव संध्या सुधाकर शेंडगे यांना ८ डिसेंबर २०१८ रोजी भारतीय सैन्य अकादमीचे अथक प्रशिक्षण परिश्रमपूर्वक पार पाडल्यानंतर लेफ्टनंटपदी नियुक्ती मिळाली होती . दोन वर्षानंतर ८ डिसें २०२० रोजी कॅप्टनपदी पदोन्नती झाली . त्यानंतर ८ डिसें २०२४ रोजी त्यांची मेजर पदी पदोन्नती झाली आहे दोन वर्षांच्या कठोर परिश्रमातून भारतीय सैन्य अकादमी, देहरादून येथून प्रशिक्षण पूर्ण करून सुरूवातीला लेफ्टनंटपदी नियुक्ती




झाल्यानंतर नौशेरा (जम्मू-काश्मीर) सारख्या दुर्गम भागात एक वर्ष आणि सियाचीन (चीन -पाक सीमा ) सारख्या उणे तापमानात एक वर्ष सेवा दिल्यानंतर अहमदनगर येथे नियुक्ती झाली .तेथेच दोन वर्षानतर कॅप्टनपदी पहिली पदोन्नती झाली .त्यानंतर सैन्य अकादमी, देहरादून येथे प्रशिक्षक म्हणून नियुक्ती झाली .तेथेच नुकतीच मेजर या पदावर दूसरी पदोन्नती झाली आहे .पदोन्नतीचा बॅज लावताना सैन्य अकादमी, देहरादून येथील वरिष्ठ अनुदेशक व शैक्षणिक विभाग प्रमुख ब्रिगेडियर एस.के.सिंग, प्रणव चे वडील प्रोफेसर डॉ . सुधाकर शेंडगे व कर्नल अनुदेशक डॉ विकास रावत, प्रणवच्या आई संध्याताई ,बंधू प्रतिक व अन्य अधिकारी उपस्थित होते . या पदोन्नतीबद्दल मेजर प्रणव शेंडगे यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे .

# विदर्भातील विहिगावात साकारतेय संत बंकटस्वामी महाराज यांचे भव्य मंदिर

## १२ तारखेला मूर्ती प्राणप्रतिष्ठा आणि कलशारोहण सोहळा

बीड । प्रतिनिधी

बीडचे भूमिपुत्र आणि महान संत बंकट स्वामी महाराज यांचे विदर्भात बुलढाणा जिल्ह्यातील विहिगाव येथे भव्य मंदिर साकारले आहे. त्याच मंदिरात दि -१२ डिसेंबर रोजी दुपारी ११.३० वाजता मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा महंत लक्ष्मण महाराज मेंगडे, रामायणाचार्य संजय महाराज पाचपोर, यांच्या प्रमुख मार्गदर्शनाने देखना सोहळा संपन्न होणार आहे..यात विदर्भ मराठवाड्यासह महाराष्ट्रातील शेकडो संत महंत उपस्थित राहणार आहेत. श्रीक्षेत्र नेकनुर जन्मभूमी येथून शेकडो गाड्या विदर्भात दि ११ रोजी सकाळीं१० वाजता रवाना होणार आहेत. या सोहळ्याचा सर्व स्वामी भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन महंत लक्ष्मण महाराज मेंगडे व भक्त परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे..



वारकरी संप्रदायाचे भक्तिसूर्य सद्गुरु संत बंकट स्वामी महाराज यांनी संपूर्ण महाराष्ट्रात वारकरी संप्रदाय प्रचार प्रसाराचे प्रभावी काम केले.. त्या काळात विदर्भामध्ये चार चार महिने बंकट स्वामी चातुर्मासासाठी वास्तव्यास असायचे. त्याचीच आठवण म्हणून बुलढाणा जिल्ह्यातील विहिगाव या गावात गावकऱ्यांनी संत बंकट स्वामी महाराज यांचे भव्य मंदिर स्थापन केले आहे. त्या मंदिरात मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा व कलशारोहण सोहळा दिनांक १२ रोजी संपन्न होत आहे. याच सोहळ्यासाठी श्रीक्षेत्र नेकनूर पंचक्रोशी व बंकट स्वामी महाराज भक्त परिवारातील शेकडो गाड्या विदर्भात दिनांक ११ रोजी सकाळीं १० वाजता श्रीक्षेत्र नेकनूर येथून रवाणा होणारं आहेत. मराठवाडा , कोकण, विदर्भ, खानदेशासह पश्चिम महाराष्ट्रातही संत बंकट स्वामी महाराज यांनी वारकरी संप्रदायाच्या प्रचार प्रसाराचे प्रभावी काम केले होते त्याचीच पावती म्हणून हे मंदिर निर्माण होत असल्याने बीड जिल्ह्यासाठीही स्वाभिमानाची बाब आहे.

# मानवलोकच्या वतीने जागतिक मानवी हक्क दिन व संविधान जागर रॅली उत्साहात

अंबाजोगाई । प्रतिनिधी

जागतिक मानव अधिकार दिनाचे औचित्य साधून जनजागृतीपर रॅलीचे आयोजन मानवलोक समाजकार्य महाविद्यालयाच्या पुढाकाराने शहरात काढण्यात आली. शहरातील प्रमुख ठिकाणी विविध विषयाचे पोस्टर्स प्रदर्शन भरविण्यात आले व लोकांशी संवाद साधण्यात आला. यामध्ये मानवलोक समाजकार्य महाविद्यालयाचे सर्व कर्मचारी व मनस्विनी महिला प्रकल्पाचे कार्यकर्ते हजर होते.

मानवी अधिकार जनजागृतीपर रॅली ही मानवलोक समाजकार्य महाविद्यालयाच्या परिसरापासून सुरू झाली. यामध्ये महाविद्यालयातील विद्यार्थी व मनस्विनी महिला प्रकल्पातील गावपातळीवरी कार्यकर्ते सहभागी झाले होते. ही रॅली तथागत चौकातून बसस्टॅन्ड मार्गे आंबेडचौकातून स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयात दाखल झाली. या मार्गावरील सर्व प्रमुख चौकामध्ये व बसस्टॅन्डमध्ये मानव अधिकार,




बालविवाह, कौटुंबिक हिंसाचार, महिलांना होणारी छेडछाड या विषयीचे पोस्टर्स प्रदर्शन लावण्यात आले होते.

या रॅलीचा समारोप स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालय अंबाजोगाई येथे करण्यात आला. त्यावेळी मानवलोक समाजकार्य महाविद्यालयातील प्राचार्य व प्रा. अरूंधती पाटील यांचा सत्कार करण्यात आला. तसेच या परिसरात सेल्फी पॉईंट व प्रदर्शनही लावण्यात आले होते. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांशी संवाद करतांना विद्यार्थ्यांनी त्यांना मानवीय अधिकार याची ओळख करून दिली व सेल्फी पॉईंटमधून १८ वर्षा आतील मुलींशी विवाह करणार नाही याची शपथही देण्यात आली.

कार्यक्रमाचा समारोप प्राचार्य थारकरसर, प्रा. सोनवळकर व प्रा. सोनवणे तसेच मानवलोक समाजकार्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रकाश जाधव, प्रा. अरूंधती पाटील यांच्या मार्गदर्शनाने झाला. रॅली व पोस्टरच्या आयोजनामध्ये मनस्विनी महिला प्रकल्पाचे कार्यकर्ते राहूल निपटे, कृष्णा गुरव, हर्षा पूरी, आश्विनी बुरकुले व सर्व प्राध्यापक वर्ग यांनी पुढाकार घेतला.

# संस्कार विद्यालयाची शैक्षणिक सहल उत्साहात



बीड। प्रतिनिधी

संस्कार विद्यालयातील पहिली/ दुसरी विभागाची सहल उत्साह पूर्ण वातावरणात पार पडली . सहलीत१२० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. सहलीतील विद्यार्थ्यांनी शिक्षकासमवेत धार्मिक , ऐतिहासिक व पर्यटन स्थळांना भेटी दिल्या , यामध्ये संभाजीनगर मधील सिद्धार्थ गार्डन , वेरूळ लेणी , पैठण मधील नाथ सागर व नाथ मंदिर या स्थळांना भेटी दिल्या.

या सहलीसाठी संस्कार प्रबोधिनीचे कार्यवाहक माननीय अॅड. कालिदास थिगळे, तसेच प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका जाधव, विभागाच्या विभाग प्रमुख श्रीमती पारगावकर ताई , यांनी मार्गदर्शन केले. सहल यशस्वी करण्यासाठी सहल प्रमुख टेकाळे , सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. या यशस्वी सहली बद्दल संस्थेचे सचिव , मुख्याध्यापिका तसेच पालकांनी अभिनंदन केले आहे.

# अंबाजोगाईत विराट हिंदू शक्तीचे प्रदर्शन, बांगलादेशातील हिंदूवरील अत्याचार थांबवण्याची मागणी

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**बांगलादेशातील हिंदूंवर होणारे अनन्वित अत्याचार थांबवावेत या मागणीसाठी आज अंबाजोगाईतील विराट हिंदू शक्ती एकजुटीने रस्त्यावर उतरली होती.**







मानवाधिकार दिनाचे औचित्य साधून अंबाजोगाईतील विविध हिंदू संघटना बांगलादेशातील हिंदूंवर होणारे अनन्वित अत्याचार थांबवावेत या मागणीसाठी एकजुटीने रस्त्यावर उतरले होते. छत्रपती शिवाजी महाराज चौकात सर्व हिंदू समाज बांधवांनी बांगलादेशात होणाऱ्या हिंदूवर होणाऱ्या अत्याचाराच्या विरोधात व हिंदू मंदिरे पाडण्याच्या निषेधार्थ छत्रपती शिवाजी महाराज चौकात तीव्र निदर्शने करण्यात आली. अंबाजोगाईतील हिंदू समाजाच्या वतीने राष्ट्रपतींची नावे येथील उपजिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले या निवेदनानुसार बांगलादेशातील हिंदू व इतर सर्व अल्पसंख्यांक समाजावर कट्टरता वाद्यांकडून होणारे हल्ले लुटमार जाळपोळ महिलां वरील हल्ले रोखण्यात यावे व हे अत्याचार तात्काळ थांबवले पाहिजेत अशी एकमुखी मागणी दिलेल्या निवेदनात करण्यात आली आहे. अंबाजोगाई येथील सर्व हिंदुत्ववादी संघटनांनी एकत्र येऊन बांगलादेशच्या विरुद्ध निषेधाच्या घोषणा दिल्या.

वंदे मातरम, जय श्रीराम, भारत माता की जय, बांगलादेश मुर्दाबाद, आदी प्रचंड घोषणा देत हा जन आक्रोश मोर्चा शहराच्या प्रमुख मार्गावरून निघाला होता सर्वत्र भगवे ध्वज,निषेधाचे फलक घेऊन तरुणाई व मातृ शक्ती ची संख्या लक्षणीय होती.

## सकल हिंदु समाजाच्या निषेध मोर्चाला माजलगावकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**माजलगाव । प्रतिनिधी**



बांगलादेश मधील हिंदू व बौद्ध समाजावर होणाऱ्या अत्याचाराच्या निषेधार्थ दि १० डिसेंबर मंगळवार रोजी सकाळी ११:०० वाजता माजलगाव शहरात निषेध मोर्चा व धरणे आंदोलनाचे आयोजन करण्यात आले होते. आयोजित मोर्चा व धरणे आंदोलनास माजलगाव शहरातील सकल हिंदू समाजाने उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन बांगलादेशचा निषेध केला

माजलगाव शहरात दि १० डिसेंबर मंगळवार रोजी सकाळी ११:०० वाजता सकल हिंदू समाजाच्या वतीने बांगलादेश मधील हिंदू साधू संतावर व बौद्ध नागरिकांवर होणाऱ्या अत्याचाराच्या निषेधार्ह धरणे आंदोलन व मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. शहरातील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौकात काही वेळ धरणे आंदोलन देऊन मोर्चाला सुरुवात झाली डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौक,छत्रपती शिवाजी चौक मार्गे हा मोर्चा माजलगाव उपविभागीय कार्यालयावर धडकला. उपविभागीय कार्यालयावर जमलेल्या मोर्चेकऱ्यांना ह.भ.प.गडदे महाराज व शिवशंभू विचार मंचाचे कार्यकर्ते पवन मोगरेकर यांनी संबोधित केले. उपविभागीय ◀◀ पान ३ वर

## विद्यार्थीप्रिय आ.सुरेश धस यांना उच्च तंत्रशिक्षण मंत्रीपद द्यावे- शिनगीरे

म्हसोबावाडी । प्रतिनिधी



आष्टी, पाटोदा, शिरूर मतदारसंघाचे भारतीय जनता पार्टी, शिवसेना रिपाई आठवले गट व मित्र पक्षाचे अधिकृत उमेदवार सुरेश रामचंद्र धस यांनी आष्टी विधानसभेच्या निवडणुकीत भूतो ना भविष्य असे विक्रमी मताधिक्य घेत चौथ्यादा विजय मिळवला आहे. त्यांनी आष्टी,पाटोदा,शिरूर येथील जनतेची मने जिंकली असून या निवडणुकीत त्यांना सर्वसामान्य नागरिकांनी भरघोस मतांनी विजयी केले आहे. २४ तास ३६५ दिवस जनसेवेत असलेले सर्वसामान्यांचे नेतृत्व म्हणून त्यांची एक वेगळी ओळख आहे. त्याचबरोबर विद्यार्थ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी ते नेहमी तत्पर असतात. यात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कागदपत्रे, फीस, विद्यार्थ्यांच्या बसेसचा प्रश्न असो, व इतर विद्यार्थ्यांचचे कोणतेही प्रश्न असो.

ते सोडवण्यासाठी नेहमी तत्पर असतात. त्यामुळे त्यांना नव्याने होणाऱ्या मंत्रिमंडळात आमदार सुरेश धस यांना उच्च व तंत्रशिक्षणमंत्री पद देऊन पक्षश्रेष्ठींने न्याय द्यावा अशी मागणी युवा नेते किरण शिनगीरे यांनी केली आहे.

## आरोपीना कठोर शासन करावे - आ नमिता मुंदडा

**केज । प्रतिनिधी**

तालुक्यातील मस्साजोग येथील माजी सरपंच संतोष पंडितराव देशमुख यांच्या मारेकऱ्यांना तातडीने अटक करावे आणि या प्रकरणाची पाळेमुळे शोधून आरोपींना कठोर शासन करावे अशी मागणी केज विधानसभा मतदार संघाच्या आमदार नमिता मुंदडा यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

मस्साजोग येथील माजी सरपंच संतोष पंडितराव देशमुख यांचे ९ डिसेंबर रोजी दुपारी अपहरण करून नंतर निर्घुण खून करण्यात आला. या प्रकरणातील आरोपी अद्याप मोकाट आहेत. त्यामुळे नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त करण्यात येत असून नागरिकात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. आरोपींच्या अटकेसाठी ठिकठिकाणी रास्ता रोको आंदोलने करण्यात येत आहेत. संतोष पंडितराव देशमुख हे मस्साजोग गावचे सरपंच होते, सदर घडलेला प्रकार अतिशय गंभीर आहे. त्यामुळे सदर खून प्रकरणाचा तपास जलदगतीने करून प्रकरणाच्या मुळाशी जावून सर्व संबंधित आरोपींना अटक करून कठोर शासन करणे अत्यंत गरजेचे आहे असे आ. नमिता मुंदडा यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि बीड जिल्हा पोलीस अधीक्षक यांना लिहिलेल्या पत्रात नमूद केले आहे. दरम्यान, आ. मुंदडा यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक अविनाश ◀◀ पान ३ वर

### संवेदनशील व्यक्तिमत्व गमावले



मस्साजोग ग्रामस्थांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी संतोष देशमुख हे सतत पुढाकार घेत. त्यांच्या कार्यकाळात त्यांनी प्रयत्नपूर्वक गावाच्या विकासात योगदान दिले. अतिशय शांत, सुस्वभावी व्यक्तिमत्व अशी त्यांची पंचक्रोशीत ओळख होती. त्यांच्या अकाली निधनाने एक संवेदनशील व्यक्तिमत्व गमावले आहे अशा शब्दात आ. नमिता मुंदडा यांनी संतोष देशमुख यांना श्रद्धांजली वाहिली आहे.

## मस्साजोग खून प्रकरणातील आरोपींना तत्काळ अटक करा - गणेश बजगुडे

बीड । प्रतिनिधी



केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांची काल निर्घुण हत्या करण्यात आली असुन २४ तास उलटुन देखील आरोपीना अद्याप अटक करण्यात आलेली नाही. हा प्रकार अतिशय निंदनीय व कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करणारा असुन या प्रकरणाचा भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्ष व शिवक्रांती संघटनेच्या वतीने तीव्र निषेध व्यक्त करत आरोपींना तत्काळ अटक करण्याची मागणी शिवक्रांती संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तथा कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष गणेश दादा बजगुडे पाटील यांनी केली आहे.

बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांचे काल दिनांक ०९ डिसेंबर रोजी दुपारच्या दरम्यान अपहरण करून त्यांची अतिशय निर्घुण हत्या करण्यात आली असुन याप्रकरणाला २४ तास उलटुन देखील ◀◀ पान ३ वर

## देशमुख हत्या प्रकरणातील मास्टरमाइंडचा तातडीने शोध घ्यावा –आ.सुरेश धस

आष्टी । प्रतिनिधी



केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांचे भरदुपारी राजरोसपणे राज्य रस्त्यावर अपहरण करून त्यांचा खून करण्यात आला आहे अत्यंत गंभीर असून या घटनेचा सखोल तपास करून या घटनेतील मास्टर माईंड कोण आहे? याचा छडा पोलिसांनी लावला पाहिजे असे मत आ.सुरेश धस यांनी व्यक्त करत केजची घटना अंत्यंत दुर्दैवी असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

माध्यमांशी बोलताना आ.धस म्हणाले की,केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच असलेल्या संतोष देशमुख यांचे अपहरण करून खून करण्यात आल्याची घटना सोमवारी घडली.एखाद्या गावच्या प्रथम नागरिक असलेल्या व्यक्तीचे अपहरण होते त्यानंतर त्याची हत्या करण्यात येते ही अत्यंत निंदनीय बाब असून या घटनेतील जे कोणी मुख्य आरोपी असतील त्यांना तात्काळ अटक झाली पाहिजे.शिवाय या घटनेच्या मागे नेमके मास्टर माईंड कोण आहेत? कारण भर दिवसा हत्या करण्याचे धाडस या आरोपींनी केले आहे त्यामध्ये निश्चितपणे कोणीतरी बडीशक्ती असावी त्यामुळे याबाबतचा तपास देखील पोलिसांनी करण्याची मागणी आ.धस यांनी केली आहे.

## जय श्रीराम पतसंस्थेस भाजपा जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुखांनी दिली भेट

माजलगाव । प्रतिनिधी



शहरातील जय श्रीराम नागरी सहकारी पतसंस्था माजलगाव येथे दि १० डिसेंबर मंगळवार रोजी भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख, भाजपा सदस्य नोंदणी जिल्हा संयोजक नवनाथ आण्णा शिराळे यांनी संस्थेला सदिच्छा भेट दिली. यावेळी संस्थेच्या वतीने प्रभु श्रीराम यांची प्रतिमा, श्रीराम नावाचा रुमाल देऊन सत्कार करताना भाजपाचे माजी तालुकाध्यक्ष तथा जय श्रीराम संस्थेचे संस्थापक अध्यक्ष हानुमान कदम, भाजपा सोशल मिडीया प्रदेश कार्यकारिणी सदस्य दत्ता महाजन, शिव शंभो विचार दर्शनचे पवन मोगरेकर,भाजपा भटके विमुक्त आघाडीचे तालुका उपाध्यक्ष रामेश्वर चव्हाण,परशुराम सेवा संघाचे तालुकाध्यक्ष सतिशराव जोशी यांची उपस्थिती होती.

## आ.सुरेश धस यांना मंत्रीपद मिळावे यासाठी ग्रामपंचायत सदस्यांचे वाळुंजच्या भैरवनाथाला साकडे

म्हसोबावाडी। प्रतिनिधी






आ सुरेश आण्णा धस यांना भाजप पक्षश्रेष्ठींनी कॅबिनेट मंत्री पद द्यावे यासाठी तालुक्यातील वाळुंज ग्रामपंचायत सदस श्रीराम नवनाथ वहाटुळे, विष्णू भैरू वहाटुळे, युवराज उद्धव खाडे, गणेश गावडे, संजय भास्कर शिंदे या पाचही सदस्याने भैरवनाथाचे दर्शन करून भैरवनाथाला साकडे घातले आहे.

आष्टी विधानसभा मतदारसंघातील जनतेने मोठ्या मताधिक्याने आ सुरेश आण्णा धस यांना विजयी केले असून ते शेतकऱ्यांचे कैवारी, विकासाचे व्हिजन असलेले, अठरापगड जाती धर्माला सोबत घेऊन चालणारे लढवैय्या नेतृत्व म्हणून त्यांची ओळख आहे. जनतेच्या सर्वांगीण विकासासाठी आ धस यांना भाजपच्या पक्षश्रेष्ठींनी कॅबिनेट मंत्री पद द्यावे अशी मागणी जोर धरू लागली आहे. तर आ सुरेश आण्णा धस यांना मंत्रीपद मिळावे यासाठी ग्रामपंचायत सदस्य श्रीराम वहाटुळे, विष्णू वहाटुळे, युवराज खाडे, गणेश गावडे, संजय शिंदे या पाचही सदस्याने भैरवनाथाचे दर्शन घेऊन साकडे घातले आहे व सर्व वाळुंज ग्रामस्थांच्या वतीने सुद्धा आण्णांना मंत्रिपद भेटावे अशी अपेक्षा वाळुंज ग्रामस्थांनी केली आहे.

## बांगलादेशातील इस्लामी कट्टरवाद्यांकडून अल्पसंख्यांक हिंदू, बौद्ध, जैन,शीख यांच्यावर होणारा अत्याचार थांबवावा -ॲड. वाल्मिक निकाळजे

**आष्टी । प्रतिनिधी**

### सकल हिंदूसमाजा व्दारे पंतप्रधान मोदी यांना निवेदन

बांगलादेशातील कट्टरतावादी मुस्लिम धर्मांधांनी अल्पसंख्यांक असलेल्या हिंदू बौद्ध जयंती आणि ख्रिश्चन समाजावर धार्मिक उन्माद पसरवून अनन्वित अत्याचार सुरू केले असून हिंदू मंदिरे उध्वस्त केली असून अल्पसंख्यांक हिंदूंच्या मानवाधिकाराचे, मालमत्तेचे आणि जीवांचे संरक्षण करण्यासाठी जागतिक पातळीवर ठोस उपाय योजना करावी अशी मागणी भारतीय जनता पार्टीच्या अनुसूचित जाती मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष, मानवाधिकार विशेषज्ञ ॲड. वाल्मीक निकाळजे यांनी केली आष्टी तालुक्यातील सकल हिंदू समाजाच्या वतीने तहसील कार्यालय येथे निवेदन सादर करताना ते मार्गदर्शन करताना बोलत होते यावेळी श्रीधर सहस्त्रबुद्धे, श्यामराव भोजने बाबुराव अनारसे रा.स्व. संघाचे तालुका संघचालक कैलास रेडेकर, लालासाहेब कुमकर, प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे उत्तम बोडखे, संजय गाढवे, बाजीराव वाल्हेकर, स्नेहल भोसले, रोहित दुशी, शुभम लोखंडे, सौरभ दाणी उपस्थित होते पुढे बोलताना वाल्मीक निकाळजे म्हणाले की हजारो वर्षांपूर्वी अफगाणिस्तान हा हिंदू देश होता परंतु इस्लामी आक्रमकांनी हिंदू बौद्ध यांच्यावर आक्रमण करून कत्तली करून हा देश इस्लामी तयार केला हाच प्रकार आता बांगलादेश येथे चालू असून तेथील धार्मिक मुस्लिम कट्टरता वाद्यांनी अल्पसंख्यांक हिंदू, बौद्ध, जैन, शीख आणि ख्रिश्चन समाजावर अन्याय सुरू केला असून हिंदू मंदिरे उध्वस्त केले असून हिंदू मुलींवर अत्याचार केल्याच्या घटना घडलेल्या आहेत बांगलादेश हा इस्लामिक देश करण्याचे प्रयत्न सुरू असून त्यासाठी हिंदू धर्मियांवर अन्याय आणि अत्याचार चालू आहे हा प्रकार आता केवळ बांगलादेशापुरता मर्यादित राहिला नसून शेजारी असलेल्या भारत देशामध्ये देखील अशा प्रकारचा धार्मिक उन्माद करण्याचा कट्टरता वाद्यांचा प्रयत्न असून त्यासाठी भारत देशातील हिंदू बौद्ध जैन शीख एकजुटीने याचा मुकाबला करण्याची वेळ आलेली आहे बांगलादेशातील इस्लामिक धर्मांधांनी केलेल्या या कृत्यामुळे बांगलादेशातील हिंदू समुदाय हा त्रस्त झाला असून जगभरातील हिंदू समुदायांनी याची दखल घ्यावयाची आवश्यकता आहे. बांगलादेशातील ◀◀ पान ३ वर

## देवदहिफळच्या फडात डोळ्याचे पारणे फेडणाऱ्या लढती!

### अनिकेत व सिद्धेश्वरचा अंतिम सामना अनिर्णीत

**भागवत साबळे । दिंद्रूड**

देव दहिफळ येथील खंडोबा यात्रेत कुस्तीच्या फडामध्ये तरुण पहेलवानांनी कुस्ती शौकिनांच्या डोळ्याचे पारणे फेडले. एकापेक्षा एक सरस झालेल्या लढतीत मल्लांनी आपले कसब पणाला लावत प्रेक्षकांची मने जिंकली. शेवटची व मानाची कुस्ती जवळा फ. येथील बजरंग बली कुस्ती संकुलातील अनिकेत गोरे व देवदहिफळ च्या सिद्धेश्वर बडे या नामांकित पैलवानांमध्ये झाली. मात्र अंधार पडल्यामुळे ही अंतिम लढत थांबवण्याचा निर्णय पंचांनी घेतला. बक्षिसांची रक्कम या दोघांना विभागून देण्यात आली.

धारूर तालुक्यातील देव दहिफळ येथे खंडोबाची मोठी यात्रा भरते. याच पार्श्वभूमीवर यात्रेत भरणारा कुस्त्याचा फड प्रसिद्ध आहे. मराठवाड्यातून नावाजलेले मल्ल या कुस्त्याच्या दंगलीत हजेरी लावतात. महाराष्ट्र केसरी शिवाजी केकाण यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून यावर्षीच्या फडास सुरुवात करण्यात आली. यावेळी माजी जि. प. सदस्य विलासराव बडे, सरपंच श्रीधर बडे, शिवाजीराव बडे, माजी सरपंच श्रीहरी बडे, भागवत तोंडे, अहमद पटेल, विकास बडे आदी मान्यवर उपस्थित होते.एकेकाळी देवदहिफळचा फड गाजविणारे गंगाधर चौरे, हारी गोरे, रामा तिडके, पप्पू कांदे, राजेभाऊ मुंडे, मुरलीधर चौरे आदी जुनेजाणते पहिलवान फडात आवर्जून उपस्थित होते. अजय मोरे, आस्तिक हांगे, लक्ष्मण करे, योगीराज नागरगोजे, धनराज केंद्रे, बाळू सलगर, गणेश पवार, हारी बडे, सुनील बडे, लखन बडे या तरण्याबांड पहेलवानांनी जोरदार कुस्त्या मारल्या. यावेळी दामोधर बडे, मुरलीधर बडे, राज बडे, सुग्रीव बडे, रमेश बडे, नवनाथ बडे, विष्णुपंत बडे, राजेभाऊ बडे, गोपाळराव बडे, बबन कांदे, अंगद वड्डे, शेख तायेर, सुभाष कांबळे, राज आंधळे, बाळू तोडे, अंगद बडे, खंडू सहजराव, दामूआन्ना बडे, रामराव बडे, पुजारी किर्तीकुमार जगताप यांच्या सह गावकऱ्यांनी सहकार्य केले.



### कुस्तीच्या फडात मुलींचा वरचष्मा

जालण्याच्या मंठा तालुक्यातील कु. वैष्णवी सोळंके या सोळा वर्षीय युवतीने कांदेवाडी येथील सोहम बडे यास काही वेळातच आस्मान दाखवले. हिंगोली जिल्यातील गोंडाळा या गावातील व कुटुंबात कुस्त्यांचा वारसा असलेल्या कु.रूपाली शिंदे हिने भोगलवाडीच्या गजानन तिडके यास चारी मुंड्या चित करून हम भी किसीसे कम नही याची प्रचिती प्रेक्षकांना दिली. या दोघी महिला मल्लांनी कुस्तीचा आखाडा चांगलाच गाजवला. कुस्तीशौकीन प्रेक्षकांनी या दोघींवर बक्षिसांचा अक्षरशः वर्षाव केला.

## डिजिटल मीडिया परिषदेच्या युनिट राज्यभरात करणार – अनिल वाघमारे

बीड । प्रतिनिधी



अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेशी संलग्नित असलेली डिजिटल मीडिया परिषद आगामी काळात आता जोमाने कामाला लागणार असून मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त श्री.एस.एम.देशमुख सर यांच्या आदेशानुसार आपण संपुर्ण महाराष्ट्र राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात महत्वपूर्ण बैठका घेऊन डिजिटल मीडिया परिषदेच्या नवीन जिल्हा कार्यकारणी करण्यासाठी निर्णय घेणार असल्याचे मत डिजिटल मिडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे यांनी व्यक्त केले.

ते बीड मध्ये पत्रकारांशी बोलताना म्हणाले की, महाराष्ट्र राज्यात मराठी पत्रकार परिषदेशी संलग्न असलेल्या प्रत्येक जिल्हा पत्रकार संघाशी आपण समन्वय साधून जिल्हा पत्रकार संघाच्या सहकार्याने संपूर्ण महाराष्ट्रात डिजिटल मिडिया परिषदेचे युनिट म्हणजेच नवीन जिल्हा कार्यकारिणी करण्याबाबत विशेष महत्त्व देऊन नियोजनबद्ध प्रक्रिया राबवणार आहोत. प्रत्येक जिल्हा स्तरावर बैठक घेऊन जिल्हाध्यक्ष व इतर पदाधिकारी यांच्या निवडी देखील जाहीर केल्या जाणार आहेत. महाराष्ट्रातील जिल्हा पदाधिकारी यांनी नवीन निवडी संदर्भात सर्व माहिती तातडीने ९८२२५४८६९६ या वाटस अप नंबर वर मॅसेज करुन कळवावी. त्यामुळे प्रत्येक जिल्ह्यात नवीन युनिट तयार करण्यासाठी सोपं होणार आहे. मराठी पत्रकार परिषदेशी संलग्न असलेल्या सर्व जिल्हा पत्रकार संघानी याबाबत दक्षता घेऊन तातडीने माहिती कळवावी असं देखील डिजिटल मिडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे यांनी कळविले आहे.


This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk



# आमदार योगेश टिळेकरांच्या मामांच्या हत्येप्रकरणी पुणे पोलिसांकडून दोघा संशयितांना अटक

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील विधानपरिषदेचे भाजपचे आमदार योगेश टिळेकर यांचे मामा सतीश वाघ यांचे सोमवारी अपहरण करून खून करण्यात आल्याची घटना घडली होती. या प्रकरणी आता मोठी बातमी समोर आली असून यात पुणे पोलिसांनी अपहरण करणाऱ्या दोन संशयितांना ताब्यात घेतले आहे. या दोघांना गुन्हे शाखेच्या कार्यालयात आणण्यात आलं असून त्यांच्याकडून सखोल चौकशी सुरु आहे. हाती आलेल्या माहितीनुसार पवन शर्मा आणि नवनाथ गुरसाळे अशी या दोघांची नावे आहेत. या प्रकरणी पुणे पोलिसांनी तपासाचे चक्र आता अधिक गातीमान करत पुढील कारवाई सुरू केली असून या संशयितांकडून कुठली नवी माहिती पुढे येते हे पाहणे आता महत्त्वाचे ठरणार आहे.

पुणे पोलिसांकडून दोघा संशयितांना अटक, तपासाला वेग

शैक्षणिक पंढरी असलेल्या पुण्यातील गुन्हेगारी सध्या चव्हाट्यावर आलेला विषय बनला आहे. पुण्यातील हडपसर येथे चक्क आमदाराच्या मामाचे अपहरण करुन हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. भाजपचे नेते आणि विधानपरिषद आमदार योगेश टिळेकर यांचे मामा सतीश सादवा वाघ (वय ५५ वर्षे) यांचं अपहरण करून त्यांचा खून करण्यात आला. हा धक्कादायक प्रकार सोमवारी घडला. सतीश वाघ (डरींळीह थरसह) यांचे सोमवारी (दि. ९) सायंकाळी सातच्या सुमारास उरुळी कांचन येथील शिंदवणे घाटात निर्जनस्थळी मृतदेह आढळला. सकाळी सव्वासहाच्या सुमारास सतीश वाघ हे मॉर्निंग वॉकसाठी गेले होते, त्याचवेळी फुरसुंगी फाटा परिसरातून नंबरप्लेट नसलेल्या एका चारचाकी गाडीतून आलेल्या चार ते पाच अज्ञात व्यक्तींनी सतीश वाघ यांचं अपहरण केलं. अपहरण केल्यानंतर काही तासांमध्येच सतीश वाघ यांचा अपहरणकर्त्यांनी खून केल्याचा अंदाज वर्तवला जात आहे. नेमक्या कोणत्या कारणातून त्यांचा जीव घेण्यात आला, हे मात्र अद्याप समजू शकलेले नाही. दरम्यान या घटनेला २४ तास उलटून देखील अद्याप अपहरणकर्त्यांचा नेमका शोध लागला नाही. पोलिसांची वेगवेगळी पथकं तपास केल्यानंतर या प्रकरणी आता दोघा संशयितांना पोलिसांनी अटक केली आहे.

### शेतजमिनीच्या आर्थिक व्यवहाराच्या अनुषंगाने तपास

सतीश वाघ यांची लोणी काळभोर परिसरातील माळीमळा येथे वडिलोपार्जित शेती आहे. ती शेती सतीश वाघ करतात. या शेतातील एक एकराबाबत दिवाणी न्यायालयात खटला सुरू आहे. त्याची सुनावणी सुरू आहे, दाखल फिर्यादीत नमूद केल्यानुसार सतीश वाघ यांनी दहा वर्षांपूर्वी एका व्यक्तीला तीस ते पस्तीस लाख रुपये जमिनीच्या व्यवहारासाठी दिले होते व पैसे परत मिळत नसल्याने वडील (सतीश वाघ) हे वारंवार कॉल करत असल्याचे ओंकार वाघ यांनी त्यांच्या फिर्यादीत म्हटले आहे. किंवा या व्यतिरिक्त अन्य कोणतं वैयक्तिक कारण आहे का याचा पोलिस तपास करत आहेत. पुण्यातील या घटनेने पुन्हा खळबळ उडाली आहे.





# मेंदू विकार, मणका विकार तपासणी व शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन

मंचर : मंचर (ता.आंबेगाव) येथील गेटवेल मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल येथे गुरुवार, दि. १२ रोजी मेंदू विकार, मणका विकार तपासणी व मोफत शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले असून या शिबिरासाठी जास्तीत जास्त गरजू रुग्णांनी नाव नोंदणी करावी. असे आवाहन डॉ. प्रमोद कुबडे, डॉ. संचित लंघे यांनी केले आहे.



महात्मा ज्योतिराव फुले योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजना अंतर्गत डॉ. साळी यांचे गेटवेल मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल, मंचर या ठिकाणी मेंदुविकार व मणक्याचे विकार तपासणी व मोफत शस्त्रक्रिया शिबिर गुरुवार, दि. १२ रोजी सकाळी नऊ ते दोन या वेळेत आयोजित करण्यात आले आहे. यामध्ये मेंदूमधील गाठी, सतत डोके दुखणे, झटके येणे, मानदुखी, अर्धांग वायू, कंबर दुखी, विसरभोळेपणा, मणक्याचे विकार, अचानक स्मृती भ्रंश, स्पॉडीलायटीस यासह विविध आजारांची तपासणी व शस्त्रक्रिया शिबिर पार पडणार आहे. या शिबिरात मेंदू व मणके विकार तज्ञ डॉ. विवेक बोंडे व डॉ. अभिजीत घंगाळे यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. या शिबिरामध्ये मोफत नाव नोंदणी करण्यात येणार असून तज्ञ डॉक्टरांमार्फत मोफत तपासणी व शस्त्रक्रिया होणार आहे. तसेच एक्स-रे, रक्त लघवी तपासणी, सिटीस्कॅन व एम आर आय तपासणीत सवलत मिळणार असल्याचे गेटवेल मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलचे संचालक डॉ.भूषण साळी आणि डॉ. दीप्ती साळी यांनी दिली.

# फोटो व्हायरल करण्याची धमकी देत विवाहितेवर अत्याचार

फेसबुकच्या माध्यमातून ओळख झालेल्या विवाहित महिलेसोबत धरणाच्या भिंतीवर एकत्रित काढलेले फोटो व्हायरल करण्याची धमकी देत वेळोवेळी महिलेवर अत्याचार करणार्या भटजीला ओतूर पोलिसांनी बेड्या ठोकल्या. त्याची रवानगी थेट येरवडा कारागृहात करण्यात आल्याची माहिती ओतूर पोलीस सूत्रांनी दिली.



शशांक जोशी (वय ३८, रा. ओतूर, ता. जुन्नर) असे अटक करण्यात आलेल्या संशयित भटजीचे नाव असून पीडित महिलेने ओतूर पोलिसात स्वतः हजर राहून या भटजीविरुध्द तक्रार दाखल केली आहे. त्यानुसार ओतूर पोलिसांनी विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत अधिक माहिती घेतली असता पीडित विवाहित महिला व संशयित शशांक जोशी यांची सन २०२० मध्ये फेसबुक अकाउंटमार्फत ओळख झाली. त्यानंतर जोशी हा पीडितेस सतत फोन करू लागला. एकदा पीडित महिला व जोशी हे खुबी (ता. जुन्नर) येथील खिरेश्वरकडे जाणार्या रस्त्यावरील धरणाच्या बंधार्यावर असताना त्याने दोघांचे एकत्र फोटो काढले. त्यानंतर जोशी याने वेळोवेळी आपल्या दोघांचे एकत्र काढलेले फोटो तुझ्या नवर्याला दाखवेल, अशी धमकी देऊन फोन करून भेटण्यास बोलवत असे. सन २०२० डिसेंबरमध्ये दुपारच्या सुमारास पीडितेचे पती घरातून बाहेर गेल्याचे बघून आरोपीने जबरदस्तीने घरात घुसून दोघांचे एकत्रित फोटो व्हायरल करेल, अशी धमकी देऊन जोशीने फिर्यादीसोबत शरीरसंबंध ठेवले. तसेच त्याबद्दल कुणास काही सांगितले तर आपले फोटो व्हायरल करेल, तसेच माझ्या जिवाचे बरे-वाईट करून घेईल अशी धमकी दिली. यानंतर पुन्हा पुन्हा भेटायचे आहे, असे जोशी म्हणू लागल्याने त्यास पीडितेने नकार दिल्यामुळे आरोपीने फिर्यादीची आई, भाऊ, बहीण यांना देखील फोन करून त्रास दिला. तसेच त्याचा मित्र तसेच पीडितेच्या पतीचे मित्र यांना देखील त्याने दोघांचे एकत्रित काढलेले फोटो पाठवले. अखेर या पीडित महिलेची सहनशीलता संपुष्टात आल्याने तिने सरळ पोलिसात तक्रार नोंदवून भटजीला जेलची हवा खायला पाठवल्याची चर्चा ओतूर गावात सुरू आहे. या प्रकरणाचा तपास ओतूरचे सहायक पोलिस निरीक्षक लहू थाटे यांचे मार्गदर्शनात सुरू आहे.

# वराळे येथे नदीत बुडून मुलाचा मृत्यू


**मावळ । प्रतिनिधी**

वराळे ता.मावळ येथील आंबीरोड जवळील इंद्रायणी नदीत सुंदराम सिंग वय(१४वर्ष रा.आंबी) ता.मावळ या मुलाचा मृतदेह आढळून आला. रविवारी (दि.०८) मित्रांबरोबर फिरायला जातो असे सांगून सुंदराम सिंग घराबाहेर निघून गेला तो परत न आल्यामुळे त्याच्या नातेवाईकांनी मिसिंगची तक्रार तळेगाव दाभाडे पोलिस स्टेशन येथे दिली होती. पोलिस उपनिरीक्षक भारत वारे यांनी तपास केला असता सुंदराम सिंग इंद्रायणी नदी मध्ये पोहण्यास गेला परंतु पोहता येत नसल्यामुळे पाण्यात बुडून त्याचा मृत्यू झाल्याचे आढळून आले.



त्याचे मित्र गाजावाजा न करता भितीपोटी पळून गेले. श्रीनिवास तळेगावकर या नागरिकाने लहान मुलाचे कपडे नदीकाठी असल्याचे वन्यजीव रक्षक मावळ संस्थेचे संस्थापक अध्यक्ष निलेश गराडे यांना सांगितले यावरुन मृतदेह शोधण्यास वन्यजीव रक्षक मावळ संस्थेचे सदस्य निलेश गराडे,भास्कर माळी,गणेश गायकवाड,गणेश सोंडेकर,प्रशांत भालेकर,शुभम यांना सोमवारी (दि.०९) दुपारच्या सुमारास यश आले. पुढील तपास तळेगाव दाभाडे पोलिस स्टेशन करीत आहे.

# शहरातील पूरस्थिती रोखण्यासाठी आराखडा तयार करा; महापालिका आयुक्तांचे आदेश



**पुणे । प्रतिनिधी**

पुणे शहरात निर्माण होणारी पूरस्थितीची कारणे शोधणारा अहवाल तयार केल्यानंतर त्याचा आता अल्पकालीन व दीर्घकालीन आराखडा तयार करण्याचे आदेश महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी दिले आहेत. यासंदर्भात आज (ता. ११) महापालिकेत महापालिका व पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांची महत्त्वाची बैठक पार पडली.

खडकवासला धरणाच्या पाणलोट क्षेत्रात विक्रमी पाऊस झाल्याने जुलै महिन्यातच धरणातून मोठ्या प्रमाणात विसर्ग वाढविण्यात आला. नदीपात्रात ओसंडून वाहू लागल्याने पूरस्थिती निर्माण झाली. सिंहगड रस्त्यावरील एकता नगरी येथे शेकडो घरांमध्ये पुराचे पाणी घुसल्याने संसार वाहून गेले. नागरिकांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले. तसेच डेक्कन, खिलारे वस्ती, पाटील इस्टेट या परिसरातही पूरस्थिती उद्भवली होती. हा पूर आल्याने महापालिका आणि पाटबंधारे विभागातही आरोपप्रत्यारोप झाले होते. त्यामुळे पुराचे खरे कारण शोधण्यासाठी आयुक्त भोसले यांनी चार सदस्यीय समिती नेमली होती. या समितीने अहवाल सादर केल्यानंतर आज महापालिकेत याची पहिली बैठक झाली. अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी.पी, शहर अभियंता प्रशांत वाघमारे, समितीचे सदस्य, पाटबंधारे विभागाचे अधिकारी यावेळी उपस्थित होते. यावेळी आयुक्तांनी पुढच्या वर्षी पूरस्थिती निर्माण होऊ नये यासाठी अल्पकालीन कामे करण्याची सूचना केली. तर भविष्यातील धोका टाळण्यासाठी दीर्घकालीन उपाय योजना करण्यासाठी आराखडा तयार करण्याचे आदेश दिले आहेत.

# बांगलादेशी व्यक्तीने पुण्यात जागा घेऊन घरही बांधले, ५०० रुपयात बनावट आधारकार्ड काढलं

पुणे : म्यानमारमधून बांगलादेशात आलेल्या आणि त्यानंतर पुण्यात राहिलेल्या रोहिंग्या व्यक्तीने बनावट आधार कार्ड काढून जागा विकत घेतली आणि घर बांधून संसारही थाटल्याचं समोर आलं. विशेष म्हणजे या व्यक्तीवर जुलै महिन्यात पोलिसांनी कारवाई केली होती. त्यानंतरही त्याने खोट्या कागदपत्रांच्या आधारे हे कृत्य केल्याचं समोर आलं. मुजल्लीम खान असं या रोहिंग्या व्यक्तीचं नाव आहे.



जुलै महिन्यात चार रोहिंग्या हे म्यानमारमधून बांगलादेशात आणि बांगलादेशातून थेट पुण्यातील देहूरोड परिसरातील गांधीनगर येथे आले होते. हे चारही लोक पंडित चाळीत बेकायदेशीर पद्धतीने राहत असल्याची माहिती पिंपरी चिंचवड पोलिसांच्या दहशतवाद विरोधी पथकाला मिळाली होती. त्यानंतर पोलिसांनी या चौघांवर कारवाई केली. मात्र याच्यातील एक असलेल्या मुजल्लीम खान यांने पुण्यात ८० हजार रुपयांना जागा विकत घेतली आणि त्या जागेवर घर बांधून संसार देखील थाटला. बनावट कागदपत्र वापरून ही जागा बेकायदेशीर पद्धतीने विकत घेतल्याची माहिती आता समोर आली आहे. मुजलीम खान याने चंद्रभागा कांबळे यांच्याकडून ८० हजार रुपयांना ६०० चौरस फूट जागा खरेदी केली आणि त्या ठिकाणी घर बांधले.

मुजल्लीम खान याने म्यानमार येथील इस्लामिक संस्थेत मौलाना कोर्स पूर्ण केलाय. तो आणि त्याची पत्नी दोन मुलांसह म्यानमार येथे राहत होता. त्यानंतर २०२२ मध्ये तो कुटुंबासह बांगलादेशात राहायला गेला. मात्र बांगलादेशात त्याला काम मिळाले नाही. त्यामुळे तो भारतात आला. कोलकत्तामध्ये राहत असताना तिथे काम न मिळाल्याने मुजल्लीम खान थेट पुण्याला आला. पुण्यात तो बेकायदेशीर पद्धतीनं राहत होता. देहूरोड परिसरात कपडे विकण्याचा व्यवसाय करत होता. भिवंडीतून कपडे आणून पुण्यातील देहूरोड परिसरात विकायचा. भिवंडीत असताना पाचशे रुपये देऊन त्याने आधार कार्ड तयार केलं आणि त्यातून त्याने भारतीय असल्याची ओळख सगळ्यांना पटवून दिली. त्यानंतर या खानने देहूरोड भागात सुपारी विकायला सुरुवात केली. याच काळात देहू रोड येथील गांधीनगर भागातील चंद्रभागा कांबळे यांच्या संपर्कात येऊन त्यांच्याकडून ८० हजार रुपयाने ६०० चौरस फूट जागा विकत घेतली आणि तिथेच घर बांधलं. मुजल्लीम खान आता जामीनावर बाहेर आहे. मात्र यातून आजूबाजूच्या देशातील लोक बेकायदेशीरपणे आणि बनावट कागदपत्रं तयार करून भारतात कसे घुसखोरी करत आहेत हे पुन्हा एकदा समोर आलं आहे.

# जिवावर आले ते डोळ्यावर निभावले! मांजामुळे वन विभागाचे अधिकारी जखमी

पुणे । प्रतिनिधी

जिवावर आले ते डोळ्यावर निभावले, याची प्रचिती सिंहगडच्या वनपरिमंडल अधिकार्यांना आली. दुचाकीवरून पुण्याकडे जात असताना बंदी असलेल्या पतंगाच्या नायलॉन मांजामुळे त्यांच्या डाव्या डोळ्याचा पडदा, भुवई व नाकाला खोलवर गंभीर जखमा झाल्या. डोळ्यावरील चष्म्यामुळे त्यांचे प्राण वाचले, अन्यथा मोठा अनर्थ घडला असता. हा प्रकार रविवारी (दि. ८) सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास सिंहगड रस्त्यावरील राजाराम पुलावरील नवीन उड्डाणपुलावर घडला.



समाधान पाटील (वय ४६, रा. खानापूर, ता. हवेली) असे या घटनेत जखमी झालेल्या वनपरिमंडल अधिकार्याचे नाव आहे. खासगी रुग्णालयात त्यांच्या जखमांवर आठ टाके घालण्यात आले आहेत. पतंगबाजी करण्यासाठी शासनाने मनाई घातलेल्या नायलॉनच्या मांजाचा सर्रास वापर सुरू असलेल्याचे गंभीर चित्र या घटनेने पुन्हा एकदा समोर आले आहे.

सिंहगडावर रविवारी (दि. ८) पर्यटकांची प्रचंड गर्दी होती. त्यामुळे दिवसभर सिंहगड किल्ल्यावर वाहतूक नियोजन करून वनपरिमंडल अधिकारी समाधान पाटील सायंकाळी साडेपाच वाजता मोटारसायकलवरून पुण्याकडे चालले होते. राजाराम पुलावरील नवीन उड्डाणपुलावर पतंगाच्या नायलॉन मांजात अडकून ते मोटारसायकलसह खाली कोसळले.

मांजाच्या दोराने त्यांच्या नाक व डोळ्याला गंभीर जखमा होऊन जोरदार रक्तस्राव सुरू झाला. त्यामुळे पाटील यांनी रुमालाने डोळा व नाकाच्या जखमा दाबून धरल्या. तेथे उपस्थित असलेल्या वाहतूक पोलिसांनी तातडीने धाव घेऊन पाटील यांना रस्त्याच्या कडेला नेले. पोलीस व नागरिकांनी त्यांना एका रिक्षातून सिंहगड रस्त्यावरील एका खासगी रुग्णालयात दाखल केले. तेथे त्यांच्या जखमांवर आठ टाके घालण्यात आले.

# नवजात बाळाला रस्त्यावर फेकलं

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यात मातेच्या भूमिकेला काळीमा फासणारी घटना घडली आहे. एका नवजात बालकाला आईने चक्क रस्त्यावर सोडून दिल्याचा प्रकार समोर आला आहे. पुण्यातील वडगाव परिसरातल्या रेणुकानगरी मध्ये ही धक्कादायक घटना घडली आहे. एवढ्यावरच न थांबता क्रूरतेचा कळस म्हणजे बाळाचा रडण्याचा आवाज येऊ नये म्हणून तान्हुल्याच्या तोंडावर चक्क प्लास्टिकची पिशवी बांधण्यात आली होती.

सोमवारी रात्री बाळाचा रडण्याचा आवाज ऐकून आजूबाजूच्या लोकांनी सिंहगड पोलिसांना संपर्क केला. त्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी दाखल होत नवजात बाळाला तातडीने ससून रुग्णालयात दाखल केले. सध्या बाळाची तब्बेत स्थिर असल्याची माहिती देण्यात आली आहे. याप्रकरणी, अज्ञात व्यक्ती विरोधात सिंहगड पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच नवजात बालकाच्या पालकांचा शोध देखील सिंहगड पोलीस घेत आहेत. या घटेननंतर स्थानिकांनी नवजात बालकाबद्दल हळहळ व्यक्त केली आहे.

# पुणे पुस्तक महोत्सवाचे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते शनिवारी होणार उद्घाटन

**पुणे । प्रतिनिधी**

वाचन चळवळीला सक्षम करण्यासाठी आणि पुण्याला नवी ओळख देण्यासाठी फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर होणाऱ्या पुणे पुस्तक महोत्सवाचे उद्घाटन राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते शनिवारी १४ डिसेंबरला सायंकाळी पाच वाजता होणार आहे. मुख्यमंत्री झाल्यावर देवेंद्र फडणवीस यांचा पहिलाच पुणे दौरा असल्याने, सर्वांनाच उत्सुकता आहे. त्यामुळे उद्घाटन समारंभाला पुणेकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन पुणे पुस्तक महोत्सवाचे मुख्य संयोजक राजेश पांडे यांनी मंगळवारी केले.



राष्ट्रीय पुस्तक न्यासाच्या (एनबीटी) फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर येत्या १४ ते २२ डिसेंबर या कालावधीत पुणे पुस्तक महोत्सव होत आहे. या महोत्सवाच्या उद्घाटनाची माहिती देण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत पांडे बोलत होते. यावेळी संयोजन समितीचे सदस्य प्रसेनजित फडणवीस, बागेश्री मंठाळकर, प्राचार्य डॉ. संजय चाकणे आदी उपस्थित होते. या महोत्सवाची तयारी अंतिम टप्प्यात सुरू असून, उद्घाटनाचा कार्यक्रम हजारो पुणेकरांच्या उपस्थितीत जल्लोषात होणार असल्याचे पांडे यांनी सांगितले. पांडे म्हणाले की, राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुणे पुस्तक महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी उपस्थित राहण्याचे मान्य केले आहे. देवेंद्रजी महोत्सवातील पुस्तकांच्या स्टॉलला भेट देऊन, लेखक, साहित्यिक, प्रकाशकांशी संवाद साधणार आहे. या निमित्ताने पुणेकरांना देवेंद्रजींशी संवाद साधण्याची संधी मिळेल. उद्घाटनाचा मुख्य कार्यक्रम फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर उभारण्यात आलेल्या भव्य स्टेजवर होणार आहे. या कार्यक्रमाला कुलगुरू, साहित्यिक, लेखक, कवी, चित्रकार, संपादक, प्राचार्य अशी मंडळी उपस्थित राहणार आहे. हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला असल्याने, पुणेकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून वाचन संस्कृतीला वाढविण्यासाठी हातभार लावावा, असे आवाहन पांडे यांनी केले.

# कुदळवाडीत आगीचा भस्मासुर; पन्नासहून अधिक गोदामे, दुकाने जळून खाक

चिखली । प्रतिनिधी

कुदळवाडी येथील एका गोदामाला आग लागली. काही क्षणातच आगीने रौद्ररुप धारण केले. या आगीत ऑईलचा भडका आणि गॅस सिलिंडरचा स्फोट झाल्याने आगीत आसपासची तब्बल पन्नासहून अधिक गोदामे आणि दुकाने भस्मसात झाली. सोमवारी (दि. ९) सकाळी साडेनऊच्या सुमारास ही घटना घडली. पोलिस प्रशासनाने आग लागलेल्या परिसरातील नागरिकांना वेळीच बाहेर काढल्याने मोठी जीवितहानी टळली. मात्र, या आगीत कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले.

शहरातील चिखली परिसरामध्ये मोठ्या प्रमाणावर अनधिकृत भंगाराची गोदामे उभारण्यात आली आहेत. या ठिकाणी दाटीवाटीने दुकाने असल्याने येण्याजाण्यासाठी अरुंद रस्ते आहेत. सोमवारी सकाळी एका दुकानामध्ये छोटी आग लागली. त्याठिकाणी ऑईलचे डब्बे असल्याने आग वाढली. काही क्षणात आजूबाजूच्या दुकानांमध्ये ही आग पसरली. त्याठिकाणी गॅस सिलिंडर असल्याने त्याचे स्फोट होऊन आगीने रौद्ररुप धारण केले. धुराचे मोठे लोट आकाशात दिसू लागले. आग लागल्याचे लक्षात येताच स्थानिकांना अग्निशमन दलाला माहिती दिली. त्यानंतर अग्निशमन दलाचे जवान आणि बंब लागलीच घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांचाही मोठा फौजफाटा परिसरामध्ये दाखल झाला. गोदाममध्ये रबर, प्लास्टिक, काच, कापड असे साहित्य असल्याने आगीने रौद्ररुप धारण केले. त्यामुळे आग आटोक्यात आणण्यासाठी पिंपरी-चिंचवड महापालिका अग्निशमन विभागाचे १३ बंब, पीएमआरडीए, एमआयडीसी चाकण, टेल्को आमि पुणे महापालिकेचे सहा बंब असे १९ अग्निशमन बंब कार्यरत होते. दुकानांमध्ये ऑईल, रंग तसेच इंधनाचे डब्बे असल्याने आग झपाट्याने वाढली.

cmyk